श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें.] ज्येष्ठ व आषाढ शके १८४८ [अंक ४-५.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

# अनुक्रमणिका. २

महाराजांचे अनुभव ... ... ... ... ४९७-५३०
स्फुट विषय. ... ... ... ... ३६२-३८२
श्री साईसच्चरित ... ... ... ... ६९१-७१०

## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरीनें आगाऊ रु. ३।≈, व्ही. . नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

## श्रीसाईभक्तांना अगत्याची सूचना.

आम्हांस अशी माहिती मिळाली आहे कीं कोणी एक गृहस्थ साईबाबांचा एक शिष्य आहे असें लोकांस सांगून महाराजांच्या ।त्या करितां म्हणून लोकांकडून वर्गणी वसूल करीत असतात. महाराजांचे नांवावर आणखीही कांहीं तोतये निरनिराळ्या तऱ्हेनें पैसे मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. श्री शिर्डी संस्थान कमेटी या बाबतींत योग्य ती चवकशी करीत आहे. तूर्त आम्हांस येवढेंच कळविणें आहे कीं वरील गृहस्थ संस्थान कमिटीस अज्ञात आहेत व त्यांना महाराजांचें नांवावर पैसे गोळा करण्याचा कांहींही अधिकार नाहीं. श्रीसाई महाराजांचे अधिकृत असे शिष्य कोणी नाहींत. श्रीशिर्डी संस्थानचे व्यवस्थे करितां अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टा मार्फत तजवीज झालेली आहे व त्या संबंधीची योजना ( ... श्रीसाईलीलेच्या पहिल्या अंकांत आम्हीं छापली आहे. संस्थानचा ... कारभार करण्याचा पूर्ण अधिकार फक्त या योजनेप्रमाणें ... संस्थान कमिटीस आहे. श्रीसाईमहाराजा प्रित्यर्थ कोणास ... संस्थानकमेटीकडे पा[ठ]वावें.

## श्री सद्गुरु साईनाथबाबा प्रसन्न.

श्री. अण्णासाहेब यांचे चरणीं त्रिकाल मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार वि. वि.

गेल्या गणेशोत्सवांत रा. चिंतामणराव कोल्वणकर ह्यांचे घरीं श्री सद्गुरु नानामहाराज श्रीगोंदेकर ह्यांचे कीर्तन समाप्त झाल्यावर मी डहाणू येथील श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबांचे उत्सवाबद्दल हकिगत पाठविण्याचें कबूल केलें होतें. त्या गोष्टीची आज श्रीचे पूजेचेवेळीं स्मृति झाल्यावरून ती हकीगत कळवीत आहें. ती अशी:—

डहाणू येथें यंदाचे गणपति उत्सवास गेलों होतों. तेथें वरील कीर्तनकार महाजांचे शिष्योत्तम रा. भाईबाबाजी,शांताराम,महादेवराव व गजाननराव अशा कांहीं मंडळींत ईश्वरप्रेमाबद्दल गोष्टी चालल्या होत्या. त्यांत रा. रा. गजाननराव ह्यांचे तोंडून प्रथम श्री सद्गुरु साईमाउलीच्या उदीचे सामर्थ्या विषयीं गोष्ट निघाली. ते म्हणाले, " मी वाणगांवसज्यावर तलाठी असतांना सज्यांतील गांवचा पाटील मुलासाठीं औषध मागूं लागला. कारण तो म्हणाला तुमचें आडनांव वैद्य आहे. मुलास अनेकपरीचे सर्व उपाय झाले गुण नाहीं म्हणून तुम्हीं तरी कांहीं उपाय सांगा. तुम्ही जें औषध द्याल तें मी देईन. तेव्हां मी नुकताच शिर्डीस जाऊन आलों होतों म्हणून मलाही वाटलें कीं, ज्याअर्थी पाटील माझेच जवळून औषध मागतो त्याअर्थी आपणही श्रीसद्गुरु साईबाबांच्या उदीचा त्यास उपयोग होईल असें करावें.म्हणून त्याचेच भिसीत नजीकचे दाभोणसज्याचे तलाठी यशवंत दादाजी कर्णीक हे रहात असत. त्यांचे हवालीं त्या उदीच्या ३ पुडया करून त्या पाटलास देण्यास सांगितलें व (इतक्यांत रा. यशवंतजी व कर्णीक आमचा विषय चालल्लेल्या ठिकाणीं आले)व ह्यांनी त्याप्रमाणें तीन पुडया माझेजवळ आणून दिल्या. त्या मी पाटलास मला वाटलें तशा अनुपानांत देण्यास सांगितल्या.(ही गोष्ट खरी आहे अशी अनपेक्षित आलेले गृहस्थानीं खात्री दिली जसें कांहीं श्री सद्गुरूरायांनी त्या

वेळीं मला पूर्णपणें सिद्धांत प्रत्यक्ष प्रमाणासहित करून दाखविण्याकरितांच व त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आनंदलहरींत जास्त वेळ डुंबत राहाण्याकरितांच त्याचवेळीं उदीमहात्म्याचें दुसरें उदाहरण दाखविलें. आमचा विषय पुरा होत आहे तोंच एक दोन गुजराथ्यांचीं मुलें रा. ह. मो. फणसे ह्यांचेकडे भजनास जेवढी मंडळी आली होती तेवढ्यांना घेऊन शा पुरुषोत्तम वनमाळी वाणी यांचे घरीं श्री सद्गुरुमाउलीच्या उत्सवाचे आमंत्रण देण्यास आले. त्या उत्सवास अर्थात आम्ही ( मी, हरी भाऊ फणसे व गजाननराव ) गेलों उत्सवांत जो श्रीचा फोटो ठेविला होता तो फारच मोहक व ज्याचे अवलोकनानें श्रद्धा वृद्धिंगतच होईल असा मांडला होता. मांगेले मंडळीचें भजन प्रेमांत व रंगांत चाललें होतें. विडापानसुपारी दूध कॉफी बदाम बर्फी वगैरेचीपात्रें प्रसाद म्हणून वाढण्यांत येत होतीं.बरीच मंडळी येऊन गेली होंती व ज्यांना भजनाची अत्यंत आवड अशी मंडळी मागें राहिली होती. आम्हीं तेथून जाण्याची परवानगी घेतांना मालकांनीं कळविलें कीं "माझी मुलगी अगदीं वाचणें शक्य नाहीं असें डाक्टर वैद्यांनीं ज्या दिवशीं ठरविलें त्याच दिवशीं मला कोणी एकानें त्याचेकडे श्री गोकुल अष्टमीचे प्रसादांत उदी आलेली दिली व म्हणाला तुमचे सर्व उपाय झाले तरी वरील उपाय अवश्य करावा" मुलीचे चुलत सासरे डॉक्टर मूळचंदराय हे मुंबईचे एल् एम् ऍंड एस् असून तेही अगदीं निराश झाले व परत जाण्यास निघाले होते व त्यांनीं हा बाहेरचा उपाय करण्यास हरकत नाहीं वात झाल्यावर निमोनियाची केस सुधारणें शक्य नाहीं असेंही ते म्हणाले. तरीही हा उपचार करून पहावा म्हणून श्री माउलीची उदी मुलीस लाविली. त्याच दिवशीं श्रीच्याच प्रेरणेनें घरींच असलेल्या दैवतांची स्मृति होऊन देवीचा चंडीपाठ आपणास येत असलेला आज करावा असें वाटलें व त्याच दिवशीं पाठास सुरवात झाली सकाळीं वाटलें कीं, मुलीला वातच आहे दुसरें कांहीं नाहीं; तरी हिंग व कोलनवॅाटर एकत्र करून डोकीवर ठेवावें व पाठ आटोपल्यावर त्याप्रमाणें उपाय केला व उदी लाविली. त्याच दिवशीं सकाळीं ९-९॥ वाजतां शनिवारीं

प्रथम उदी मिळाल्यापासून तिसरे दिवशीं सकाळीं मुलगी चांगली शुद्धीत आली आहे असें दिसलें व सर्व मंडळीस एकप्रकारचा आनंद वाटूं लागला. उदीच्या सामर्थ्याबद्दल सर्वांना बाबांबद्दल एकनिष्ठ श्रद्धा वाटूं लागली. मला तर उदीचा विषय निवाला व त्यांचे सामर्थ्याचा प्रत्यक्ष उत्सव त्याच क्षणीं मला पाहाण्यास मिळाला ह्याबद्दल सद्गुरुमाउलीचें अंतरसाक्षित्व किती जागृत आहे ह्याची कल्पना झाल्यामुळें अत्यानंद झाला व घरीं निजेपर्यंत नव्हे—श्रीनानामहाराजांचे कीर्तन समाप्तीपर्यंत मी सारखा आनंदांत होतों. वरील हकीगत मी श्रीसाईलीलेंत देण्याबद्दल त्यांस कळवितां त्यांनीं माझ्यावरच ही कामगिरी सोंपविल्यामुळें वरील हकीगत कळविली आहे.

आ. आज्ञाधारक

शांताराम बळवंत नाचणे

## श्रीसद्गुरु समर्थ.

रा. रा. रावसाहेब दाभोळकर मु. वांद्रें यांसी विज्ञापना. आपले आज्ञेप्रमाणें माझे श्रीसाईमहाराजांसंबंधाचे अनुभव लिहून पाठवित आहेत.

माझा व महाराजांचा संबंध येण्यास ब्रह्मीभूत श्रीराममारुती-कल्याण व श्री. कै. वा. नानासाहेब चांदोरकर मु. कल्याण या दोन व्यक्ती मुख्य कारण होत. श्रीराम मारुती यांचा माझा बरेच दिवसांचा परिचय होता. श्री. नानासाहेब चांदोरकर यांचे घराण्याचा व माझा दोन पिढ्यांचा स्नेह संबंध आहे. श्री. नानासाहेब यांचे वडील व माझे वडील समान हुद्याचे एकाच खात्यांत अमलदार होऊन पेन्शन घेऊन दोघेही अपले घरीं कल्याणास रहात होते. दोघांचीही घरें एकाच आळींत एकास लागून एक अशीं होतीं. आमचे प्राथमिक शिक्षण एकाच शाळेंत व बाळपणाचे दिवसही एकाच ठिकाणीं गेले. पुढें उच्च शिक्षणास श्री. नानासाहेब हे बाहेरगांवीं गेले. व नोकरी संबधानेंही त्यांस पर जिल्ह्यांत जाऊन रहावें लागलें यामुळे मला त्यांचा वियोग बरेच

दिवस झाला होता. परंतु आमचे सुदैवानें ते ठाणे जिल्ह्यांत आपले घराकडेस आले. तेन्हां मी जुना सोबती म्हणून मुद्दाम तपास करून त्यांनीं आपण होऊन मला प्रथम भेट दिली. असें पहील्यानेंच त्यांहीं आपले मन मोठें करून स्नेह-दीप उज्वलीत केला. मी त्यांजकडे नेहमी जाऊं लागलों.

श्री. नानासाहेब आल्यापासून ह. भ. प. दासगणूमहाराज यांची कीर्तनें येथें होऊं लागलीं श्रीराम मारूती–कीर्तनाचे भोक्ते–माझेकडे येऊन आपले सहवासाचा मला लाभ देऊन कीर्तनास नेऊं लागले. मी व माझी मुलें-सुद्धां कीर्तनास जाऊं लागली. येथें बाबांचें भक्ति प्रेमाचें बीजारोपण आपले अंतःकरणांत पेरलें गेलें.

नव्हेंबर सन १९११ सालीं माझे वडील मुलाचे मनांत श्रीबाबांचे पायीं डोकें ठेवावें असें आलें. मी याच सालीं प्रदोष उद्यापन केलें होतें श्रीराम मारूती त्यासमयीं प्रसादास असल्यामुळें मी त्यांजपाशीं अनुग्रहाची याचना केली परंतु त्यांनीं याजबद्दल बाबांकडे बोट दाखविलें. यांजमुळें म त्यांस बाबांचे चरणीं नेऊन घालण्याबद्दल विनविलें. आम्हीं उभयतां ( त्रिवर्ग) मुलासुद्धां बाबांकडे शिरडीस जाण्यास निघालों. श्रीराम मारूती यांचा कांही शिष्य सांप्रदायही याचवेळीं बाबांकडे जाण्यास कोपरगांव येथें आला होता. त्यांहीं सर्वांनी शिरडीस जाण्याच्या बैलगाडया गुंतविल्यामुळें आम्ही मागे राहिलों. परंतु " बाबांचे चरणीं मस्तक ठेविल्याविना परतणें नाहीं " हा दृढ संकल्प असल्यामुळे , सर्व मंडळी एकामागून एक तेथून निघाली नाही तोंच एक तांगा तेथें आला. त्यांत बसून शिरडीस आलों, आम्हांस तांगा भाडेंही रीतसरच पडलें.

रिवाजाप्रमाणें बाबांचें दर्शन व आरती झाली. माझे मुलापासून बाबांनीं बरेच वेळां दक्षणा व नैवद्य मागितला. तो त्यानें मुद्दाम प्रेमपुरःसर त्याचे आईनें करून दिलेला दिला. त्याचा अंगिकार करून त्यास आशिर्वाद देऊन मस्तकीं हात ठेऊन तीन चार वेळ उदी लाविली.

मी बाबांचे पायांपाशीं बसून पाय चेपले. बाबा मजकडे पाहिनात व दक्षिणाही मागेनात. घराहून निघतांना बाबांनी दक्षिणा मागतली नाहीं तर आपण तसेच परत येऊं म्हणून बोल्लों होतों. परंतु दक्षिणा मागितल्यास रु० १।. ( म्हणजे श्री सत्यनारायणाची महापूजा दक्षणा ) देण्याचा संकल्प केला होता. आरती झाल्यावर सर्वांस " वाड्यांत जाऊन बसा. जेवल्यावांचून जाऊ नका" म्हणोन आज्ञा झाली.मी जाऊं लागलों असतां " मजला विचारिल्यावांचून जाऊं नको " म्हणून मला आज्ञा मिळाली.

आम्हीं परत जाण्यास निघालों. दोनदां गेलों पण बाबांची भेट होईना. मुलास तर नोकरीवर जाणें जरूर. मला मागें ठेऊन तो परत जाण्यास कबूल होईना. अशा पेंचांत अडकलों. तिसरे खेपेस बाबांनीं मजला मशीदी बाहेरच उभें राहण्यास सांगितलें. मुलगाही जवळच होता. तो दुःखानें फार अशक्त झाला होता. बाबांनीं आपलें सर्वांग दाखवून म्हणाले " भोक्तृत्व कोणास चुकत नाहीं. तें भोगलेंच पाहिजे " नंतर रागाचा आविर्भाव आणून म्हणाले " शिंच्याला इतके दिवस खायाला घातलें आणि मळके कपडे मला धुण्यास सांगितलें तर नाहीं म्हणतो—माझे मला ते धुतलेच पाहिजेत. परंतु लोकांची मजा पाहा" असें म्हणून आम्हांस परत बोलाविलें. मी जवळ जाऊन पायांस मिठी मारतांच, "दक्षिणा देशील का ?" असे म्हणाले. मी हो म्हणून बोल्लों. ठरल्याप्रमाणें मुलानें मला रु.१। दिला. तो मी बाबांचे हातीं ठेविला. तेव्हां बाबा प्रेमानें नाचून म्हणूं लागले-"यानें तर १। रु.पया दिला—रु. १। दिला." ॥ श्रीराम परवर दीगार ॥ सत्तेचे आपलें घर ॥ हें आहे एक मी येथें ॥ यावें हो नेहमी बरें ॥

हें वाक्य मीं घोकून पाठ करूं लागलों. तों याचा एक अनुष्टुप छंद झाला. म्हणून पुढें तो मुद्दाम लिहून ठेविला. मुलाजवळ दक्षिणा मागितली त्दी देऊन परवानगी दिली. आम्ही परत आलों . वाटेंत लिहून ठेविलेल्या श्लोकाचा विचार करूं लागलों तेव्हां आपण गरीब स्थितीतली माणसें. आपण -

नेहमी येथे कसे येणार ? परंतु बाबांचे बोल वृथा होणार नाहींत.तेव्हां निर्णय झाला की कल्याणास श्री. नानासाहेब यांजकडे वारंवार नेहमी जात असावें असा बाबांचा आदेश दिसतो. वरील श्लोक हाच अनुग्रह—व श्री. नानासाहेब हेच बाबा असें जाणविलें आहे.

कल्याणास उतरतांच पहिल्यानें आम्ही उभयता श्री. नाना साहेबांकडे गेलों. त्यांस हें सर्व सांगितलें. त्यांनीं माझीं सर्व अनुमानें बरोबर असल्याचें सांगितलें दुसरे दिवसापासून माझें जाणें येणें त्यांजकडे होऊं लागलें. प्रथम श्री. नानासाहेबांनीं मजजवळून " रामरक्षा स्तोत्र " पाठ करवून घेतलें. माझे वडीलांचा समर्थ सांप्रदाय व त्याचाच ल्हानपणापासून मजला अभिमान आवड व आदर वाटत असे. भक्ष्याभक्ष्य पेयापेय हें या सांप्रदायांत पथ्य. हीच भावना मी दृढ केली. अशा करितां कीं बाबांचें स्मरण निरंतर असावें.

पुढें एकच महिन्यानें माझे दुसरे मुलाचे मनांत शिरडीस जाण्याचें णालें. आम्ही उभयतां निघालों. श्रीराम मारूतीही पुन्हां येथेंच येऊन राहिले होते. आम्ही दर्शन घेऊन दक्षिणा दिली. आरतीचे वेळीं श्रीराम मारूती मी व मुलगा असे एका ठिकाणीं उभे होतो. बाबा माझेकडे पाहून म्हणूं लागले-"दोन हजार वर्षांपासून आपला संबंध 'पहिल्यापासून हा वात्रट याला माकड चेष्टेची फार आवड." आरती झाली. जेवणें झालीं. दुपारीं आम्ही दरबारांत बसलों. तेव्हां मी बाबांचे पाय चेपीत होतों. बाबा प्रेमांत येऊन म्हणाले "यजमान असे लांब कां ?" असें म्हणून मजला जवळ ओढून, पोटाशीं धरून मातेप्रमाणें तोंडावरून हात फिरवून कपाळास उदी लाविली व डोक्यावर हात मारून म्हणाले, सहा रु. दक्षिणा दे. मी मुलांपाशीं मागतांच त्यानें ती दिली. ती मीं बाबांचे हातीं ठेविली. बाबा म्हणाले, "पोर कसें चटाचट पैसे देत आहे—अल्ला तेरा भला करेगा " असें म्हणून मला म्हणाले, "पाहिजे तेव्हां मला पाहिजे तें सांगावें संकोच धरूं नये." बाबाहीं माझे जवळून व मुलाजवळून दक्षिणा मागितली. आमचेजवळ पैसे

मुलीच राहिले नाहींत. श्री. काकासाहेब दिक्षीतांची व मुलाची चांगली ओळख असल्यामुळें त्यांचे जवळून पैसे घेऊन आम्ही दुसरे दिवशीं दुपारीं परवानगी घेऊन परत आलों.

या खेपेस मंत्री सॉलिसिटरचीं मुलें तेथें आलीं होतीं. त्यांत धाकटे मंत्री सॉलिसिटरही होते. त्यांनीं बाबांजवळ अशीच आमचे वडील मुंबईस आहेत त्यांजवर कृपा करा म्हणून विनंति केली. बाबा म्हणाले' "अरे माझी कृपा कोणावर नाहीं—सर्वांवर माझी कृपा सारखीच. माझे कृपेवांचून झाडाचें एकही पान हालत नाहीं." मला हें सांगणें म्हणजे पुढील वर्गांतील शिकवण-असें वाटलें.

कल्याणास आल्यावर श्री.नानासाहेब यांजकडे पहिल्यानें जाऊन हें सर्व सांगितलें. श्री. नानासाहेब यांनीं या खेपेनंतर मला ईशावास्योनिषदाची संथा दिली. अर्थ सांगितला. रोज पाठ म्हणून घेऊं लागलें. सर्व पुरें झाल्यानंतर सन १९१३ सालीं पुन्हां शिरडीस गेलों. बाबांचे पाय चेपीत असतां बाबा बोलूं लागले:—"एक उंटावर बसून स्वार चालला. तें उंट हागलें. मीं ती लीद सगळी धोतरांत घेतली आणि सगळी खाल्ली. पोट फुगलें चैन पडेना. तेव्हां स्वारास माझी दया आली. त्यानें मला चार चण्याचे दाणे दिले. ते मी खाल्ले. पाणी प्यालों तसा मला मोठा ढाळ झाला. पोट उतरलें. आतां पुढें बरें होईल."

दुपारीं परवानगी व उदी घेऊन निघालों तों कल्याणास येऊन नाना-साहेबांस भेटलों, सर्व सांगितलें, नानासाहेबानीं ठीक आहे असें म्हटलें. मी घरीं आलों.श्रीराममारुती मला भेटले त्यांसही हेंच सांगितलें. त्यांनीं चतुःश्लोकी भागवत म्हणण्यास मला सांगितलें; बाबांनीं हेंच सांगितलें असें ते म्हणाले. मी तें पाठ केलें. यावरून माझी अशी समजूत झाली कीं तत्वतः "ईशावास्य" व "चतुःश्लोकी" भागवत हीं एकच आहेत. एक श्रुती व दुसरें पुराण.

माझे तिसरे मुलाचें लग्न धुळ्यास सन १९१३ सालीं झालें. परत कल्याणास येतांना मुलगा, सून वडील सून कुटुंब व लहान मुलगा, सर्वांत लहान मुलगी, व वडील जांवई व त्यांचा मुलगा ( माझा नातु ) असे आम्ही बाबांचे दर्शनास 'गेलों. दर्शन घेतलें. सर्वांपासून दक्षिणा घेऊन, उदी देऊन बाबांनीं आशिर्वाद दिले. वडील सुनेचे पदरांत नारळ घातला. तीस पुढें मुलगा झाला. तो हल्लीं १२ वर्षांचा आहे. त्याचें नांव रमेश (रमावर) असें ठेविलें.

दुपारीं परत येण्याविषयीं परवानगी मागितली. "उद्यां जा" म्हणून आज्ञा केली. सर्वत्र राहाण्यास तयार होतीं परंतु हा मुलगा, कल्याणास इतर मंडळी घेऊन पुढें गेला होता; याच सबबीवर आम्हांस राहूं देईनात. म्हणून आम्हीं बाबापाशीं गयात्रयां येऊन परत जाण्यास परवानगी मागितली. बाबा बोलले, " १०।५ रुपये दक्षणा देतोस ?" मीं कबूल केल्यानंतर पांच ५ रुपयांची नोट व पांच ५ रुपये बंधे असे देत असतां बाबांनीं नोट घेतली नाहीं. मी फार प्रयत्न केले. शिरडी गांवांत ते दिवशीं पांच रुपयांचे नोटीचे बंधे रुपये मिळेनात. बाबांनीं नोट परत दिली. व ५ रु. खिशांत टाकले व म्हणाले, "तीन (३) आणि दोन ( २ ) पोंहचले" नंतर परवानगी दिली. बैलगाडी करून आम्ही निघालों. निमगांवांपासून जो एक सारखा पाऊस लागला तो कोपरगांवीं नदीपर्यंत. येथें महादेवाचे देवळांत कपडे भिजून गेले होते म्हणून उतरलों. पुढें गाडींत बसलों. नंतर माझे हातांतून सारखे बांब येऊं लागले. प्राणांतिक अवस्था झाली. तेव्हां सौभाग्यवतीनें बाबांची उदी हांतास चोळिली. आराम वाटला. आम्ही परत आलों. नानासाहेब यांजकडे गेलों.त्यांनीं "ईशावास्याचें श्रवण, मनन व निजध्यास ठेवावा" असें सांगून मार्ग दाखविला.

सन १९१६ सालीं कै. वा. बाळासाहेब भाटे यांचे जांवई नानासाहेबांचे घरीं प्लेगनें आजारी होते. मी या पूर्वीं शिरडीस जाण्याकरितां २।४ वेळां नानासाहेबांजवळ परवानगी मागितली होती. त्यांनीं " शिरडी " व

" कल्याण " यांत काय अंतर आहे ? खर्च करून शिरडीस कशाला जायला पाहिजे असें सांगत असत. या वेळीं मला बोलावून आणून पैसे देऊं लागले व म्हणाले कीं बाबांकडे जाऊन हा निरोप सांग व भाटे यांनीं त्यांचे मुलीस पाठविली तर घेऊन ये. मी पैसे घेण्याचें नाकारिलें व म्हणालों, मला शिरडीस जाण्याची ही अज्ञाच आहे. बाबांचे पायीं डोकें ठेऊन आपला निरोप कळवितों. त्या प्रामाणें गेलों.

बाबांचें दर्शन घेतलें दक्षिणा दिली उदी घेतली. व आशिर्वाद घेतला. श्री. काकासाहेब दीतिक्ष यांचेमार्फत नानासाहेबांचा निरोप बाबांचे कानीं घातला. दुसरे दिवशीं बाबांचे पाय चेपीत असतां सहज बाबाही मजकडे पाहातांच परत जाण्यास परवानगी मिळेल का म्हणून विचारलें. उदी देऊन "उद्या जा" म्हणून परवानगी दिली. आरती झाली. सर्वांबरोबर मला बाबांनीं उदी दिली. तेव्हां बाबांस श्री. काकासाहेबांनीं माझे जाण्या विषयीं प्रश्न केला. तेव्हां मी उभा राहिलों म्हणून बाबा रागानें बोलले "गाढवा एकदां उदी दिली असतां उभा कां ? हो बाजूला." मी बाजूला झालों.

मी परत नानासाहेबांकडे गेलों.त्यांस सर्व सांगितलें. या खेपेस त्यांनीं केनोपनिषद पाठ म्हणण्यास व कठोपनिषद वाचण्यास सांगितलें व संथा दिली. त्यानंतर त्याच वर्षी मी पेन्शन घेतलें. बाबांचे ह्यातींत सन १९१८ पर्यंत व पुढें १९२६ पर्यंत पुष्कळदां प्रयत्न केला तरी शिरडीस जाण्याचा योग आला नाहीं. अकस्मात अडचणी उभ्या रहात. त्याबद्दल श्री. काकासाहेब दीक्षित व रा. दाभोळकर यांची अनेक वेळां माफी मागितली आहे. बाबांची मर्जी नसल्यास माणसांचें काय चालतें !

सन १९२३ सालीं माझा सर्वांत लहान मुलगा सालिसिटरचे परीक्षेंत उत्तीर्ण झाला. तो व माझी दुसरी मुलगी व तिचीं मुलें या सर्वांस समाधीचे दर्शनास पाठविलें. यावेळीं मला एकाएकीं भयंकर दुखणें झाल्यामुळें जातां आलें नाही म्हणून दुसरा मुलगा भालचंद्र यास ब्रबोबर देऊन पाठवावें लागलें.

बाबांचें समाधीदर्शन प्रथम घेऊन मुलानें आपला सॉलिसिटरचा धंदा सुरू केला आहे.

सन १९२५ चे नवंबर महिन्यांत मी हवा पालटण्याकरितां देवळालीस गेलों. तरीही माझी प्रकृति सुधारली नाहीं. डोळ्यांत क्याटेराक्ट दिसूं लागला. पुढें १९२६ चे फेब्रुवारी मध्यें जे. जे. हॉस्पिटलमध्यें डोळे दाखविले. ऑपरेशन करणें जरूर म्हणून कळलें. आतां प्रकृति नादुरुस्त, डोळे बिघडले. तेव्हां बाबांचे छबी समोर उभा राहून मी प्रार्थना केली:—कै. नानासाहेबांचे कृपेनें आपल्या पाशीं आजपर्यंत तोंड पसरण्याचें कारण पडलें नाहीं. आतां अखेरचे दिवस आले. डोळ्यांनीं दिसत नाहींसें होणार, तेव्हां मागणें हेंच मागतों एवढें दे:—

"बाबांचें समाधी दर्शन"

"मशिदमाईचें दर्शन"

"शिरडीचे बालगोपाळांत नाचणें उडणें"

व

"शेवटीं पंढरपुरीं नेऊनी श्रीविठ्ठलचरणीं घालीं"

तिसरे दिवशीं माझे एक स्नेही—अण्णा फणसे मजकडे आले आणि म्हणाले "पंढरीस येत असाल तर माझी तयारी आहे." मी सांगितलें:—श्री रामनवमीस शिरडीस व पुढें पंढरपुरास जाऊं असें असेल तर बेत करूं. त्यानीं तें कबूल केले. आम्ही शिरडीस गेलों. सर्व दर्शनें यथास्थित केलीं. फारच आनंदांत काळ गेला.

पंढरपुरास श्री. विठ्ठलाचे चरणाचें दर्शन घ्यावें म्हणून बाबांचे परवानगीस्तव येथें आम्हीं आलों. श्री. पुढें रामनवमी उत्सवांत एकादशीचे दिवशीं ह. भ. प. दासगणू यांचें बाबांचे समाधीपुढें कीर्तन चालू असतां आम्ही समाधीचे पुढें अगदींच जवळ बसलों होतों. समाधीवर बाबांची छबी, छत्रचामरयुक्त ५।६ फुटांचे उंचीवर होती. तिजकडे पाहातांच मजला बाबांचे छबीचे

ठिकाणीं श्री विठ्ठल मूर्तीच दिसूं लागली, म्हणून मीं शेजारचे मंडळीस विचारलें कीं " आज एकादशी म्हणून श्री विठ्ठलाची छबी समाधीवर ठेविली आहे काय ? " त्यांनीं नाहीं म्हणून सांगतांच मी जास्त निरखून पाहूं लागलों. परंतु श्री विठ्ठल मूर्तीवांचून दुसरें कांहींच दिसेना. कीर्तन संपल्यानंतर माझे स्नेह्यांनीं मजला समाधी वरील छबीचे अगदींच नजीक नेलें. शृंगारलेली छबी बाबांचीच आहे असें दाखवून दिलें. "श्री विठ्ठल पंढरपूरचे तेच हे शिरडीस बाबा" असें मनास पक्कें पटविलें. मंडळीची परवानगी घेऊन पंढरपुरास जाण्यास आम्ही शिरडीहून निघालों.वाटेंत ताप भरत चालला यामुळें परत कल्याणास जावें असें म्हणूं लागलों. आण्णानीं सांगितलें तुमची तयारी असल्यास मी तुम्हांस नेतों सर्व व्यवस्था तुमची मी करीन. कंटाळा होणार नाहीं. अशी त्यानीं स्वखुशीनें हमी घेतल्यामुळें आम्ही पंढरपुरास गेलों. त्यानीं स्नानें वगैरे सर्व यथास्थीत केलें व यथासांग त्यानें व मी यात्रा केली.

पंढरपुरास दर्शनें करित असतां सहजगत्या ह. भ. प. दास गणू यांचे वाडयांत बाबांची छबी पाहिली. पाहातांच "शिरडी आणि पंढरपूर बाबा हेच विठ्ठल" असें अनुभवास आलें.

नंतर चंद्रभागेला वंदन करून व पुंडलिकाचें दर्शन घेऊन श्री विठ्ठलचरणीं कडकडून मिठी मारली. अशा रीतीनें बाबांनीं माझी मनेच्छा पुरवून आम्हांस सुखरूप कल्याणास आणून सोडिलें. आतां मला बरें वाटतें,डोळ्यांनींही बरेंच दिसूं लागलें आहे. माझे सर्व मुलगे चांगले कर्ते निघाले आहेत.सर्व मुलींचीं लग्नें झालीं आहेत.आतां बाबांचे ध्यानावांचून मला दुसरा उद्योग नाहीं. म्हणून बाबाचें चरणीं मागणें आहे कीं बाबा शेवट गोड करा.आपल्या चरणापाशीं सतत मला ठेवा. पळभरही दूर करूं नका.

"श्रीसाई सद्गुरुमहाराज"

यावरून बाबांनी मज जवळून १।. रुपया घेऊन आपलें चरित्र पाहण्यांची सेधी दिली व श्रीसत्यनारायणाचे कथेंतील फलश्रुती:—

"इहलोके सुखं भुक्त्वा ॥ अन्ते मोक्षमवाप्नुयात् ॥

या उक्तीचा अनुभव दाखवीत आहेत असें मी समजतों.

संतपायाचा दास

त्रिंबक आनंदराव कर्णीक.

## ॐ श्री गुरुसाईश प्रसन्न.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु ॥ गुरुर्देवो महेश्वरः ॥
गुरुस्साक्षात्परब्रम्ह ॥ तस्मै श्री गुरवे नमः
सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय ॥
धरावे ते पाय आधीं त्याचे ॥
देव ते संत । देव ते संत ॥ कलियुगीं जाण मूर्तिमंत ॥

श्रीमंत परम दयाळु भक्त काम कल्पद्रुम श्रीसंत चूडामणी श्रीसाईबाबा महाराज श्री क्षेत्र शिर्डीयांचे प्रथम दर्शनाचा लाभ मला सन १९०४ सालांत जाहला. त्या आधीं श्री क्षेत्र रामेश्वर यात्रेस वऱ्हाडांतून पाय रस्त्यानें जात असतां परमहंस श्री गजानन महाराज यांचें शेगावांस दर्शन झालें. त्यांची वाणी निघली ती अशी, "तुझा गुरू दक्षिण दिशेसच भेटेल" त्यानंतर पुढें हरिहर बुवांची शिवली ह्या गांवीं गांठ पडली. ते साधु मौन—व्रती—हरिहर या नावाशिवाय दुसरे शब्दच मुखावाटे काढीत नसत. त्याच गांवीं मला एक घोडा बसावयास एका पाटलानें दिला, तो अत्यंत खाष्ट व खोडकर होता व त्याचेवर आरोहण करणें म्हणजे दुर्घट. तोंडाकडून ( समोरुन ) गेलें असतां चावावें, मांगून गेलें असतां लाथा मिळाव्या, अशा खोडकर पशूचा लाभ शिवलीस जाहला. त्याच वेळेस मौनी हरिहर बुवांस प्रश्न केला मोक्ष गुरू कोठें व कसा

लाभेल. खुणेनें व लेखानें त्यांनी कळविलें की, पश्चिम दिशा, लांब गेलें की अश्वच नांवाचे गावी. पुढें रामेश्वरयात्रा करून परत पाय वाटेनें पंढरपुर आदि क्षेत्रें पहात नगर जिल्हा "संताची खाण" (मायभूमी). त्या जिल्ह्यांत बेलापूर गांवीं केशव गोविंद या महासत्पुरुषांचे समाधीस्थानांचें दर्शन घेऊन पुढें कोपरगांवी श्रीगौतमी गंगेवर क्षौर करावा असें बरोबरचे मंडळीसह ठरविलें. होतें. आम्ही पाय रस्त्यानें चाललों होतों. शिर्डीवरूनच तो रस्ता होता. शिर्डीस एक महासाधू राहतात हें पूर्वी ऐकिलेलें असल्यामुळें त्या संतदर्शनाचा लाभ अनायासें वाटेवरच लाभणार म्हणून आनंद झाला. येथें श्रीतुकाराममहाराजांचे एका अभंगाची आठवण झाली. ॥ सांपडली वाट जातांगंगास्नाना ॥ मस्तकीं तों जाणा ठेविला कर ॥ सद्गुरुरायें । कृपा मज केली ॥ परिनाहीं घडली सेवा कांहीं ॥ धृ० ॥ बांबाजी आपुलें सांगितलें नाम ॥ मंत्र दिला रामकृष्ण हरी ॥. तरीपण माझे या अभंगांत सांगितलेल्याचा अनुभव येण्यास खरे सद्गुरु श्री साईबाबा होत, ही भावना त्यावेळेस झाली नाहीं. ही भावना दृढ होण्यास १९०६ ते ११ या पांच वर्षांचा काल लागला याबद्दल इषारा श्रीनीं प्रथम भेटींतच "पांच वर्षांनींच कळेल" ही वाणी काढली होती. त्या मुदतींत श्री. नानासाहेब चांदोरकरांची तसेंच श्री. जनार्दन धोंडदेव करंदीकर व श्री. बाळसाहेब देव यांच्या भेटी होऊन महाराजांच्या बऱ्याचशा लीला त्यांचेकडून कळल्या. श्रीबाबा हे खरोखरच सद्गुरु आहेत ही खात्री झाली. असो. वर म्हटल्याप्रमाणें श्रीकेशव गोविंदाचे समाधीचे वंदनादि विधी बेलापुरास करून समागमें असलेली मंडळीसह श्रीक्षेत्र शिर्डी येथें आलों. त्यावेळची शिर्डी व आताची शिर्डी यांचें चित्र जर पुढें ठेवलें तर "खुदा करेसो क्या नही बनता॥ फत्तर जिंदा बनता है या प्रमाणेंच होय," त्या वेळेचें तें कंटकारण्य बाभूळवन. कांटेरी झाडें, गांव तर किती आंखुड व तुरळक माणसांची येर झार १।२ विहीरी व घाटी माणसांची वागणूकीची पद्धति आदि सर्व विचित्रच होय. पण तो विचित्रपणा जाऊन, विविध नररत्नें त्याशिलधींत शिरून मुक्त, सिद्ध व साधक बनून गेली व जात आहेत. अस्तु. बरोबरचे मंडळीसह शिर्डीचे गांवाबाहेर बाभूळ वनांत आलों. मंडळीचा विचार पुढें कोपरगांव येथें श्रीगौ-

तमी गंगा-गोदावरी कांठी क्षौरादि विधीकरून १।२ दिवस राहून जावें असा ठरून आम्ही सर्व मंडळी त्यामार्गानेंच श्रीसाईश प्रभूचे गांवाबाहेर आलों. मंडळीना, तुम्ही पुढें चला. मी येथें एक साधुमहाराज आहेत त्यांचें दर्शन घेऊन लौकर येतों असें म्हणालों. पैकीं कांहीं मंडळी म्हणाली उशीर होईल व तुम्ही एकदां नादीं लागलांत कीं मागची पुढची कांहीं आठवण राहात नाहीं व पुढें क्षौरादि यात्रा होणें आहे. आपण पुन्हां केंव्हां तरी येऊं. पुष्कळ संत आहेत. वगैरे भाषणें झालीं.मी एकच सांगितलें कीं देवसारावे परते।संत पूजावे अतें॥ तुम्ही पुढें चला. त्यांसर्वांस पुढें वाटेस लावून मी माझे वारूस एका झाडास (बाभळीच्या) बांधून दुसऱ्या झाडास मागिल पाय बांधले.कारण रस्ता रहदारीचा व जनावर खोडयाळ। उगीच दुसऱ्यांस इजा होऊन आपणासही त्रास होईल. त्या घोडयास मी बांधीत असतां एक वयोवृद्ध फकीर हातीं टमरेल ( टिनचें ) घेतलेला इकडे तिकडे जवळच हिंडत होता त्यास मी विचारलें कीं यहांपर एक साधूमहाराज रहेते है ऐसा सुना है वह यह गांवमें कौनसे जगहपर है मुझे आप कहोगे क्या ? इतक्यांत ते मोठ्यानें उद्गारले, "तेरे मा. के ××××" मी मनांत विचार केला कीं मी चांगलें विचारलें असतां असें कां बरें उत्तर दिलें ! मला वाईट वाटून मी मनांत म्हटलें एवढा मोठा हा थेरडा झाला, नी नीट उत्तरही देत नाहीं ! नंतर मी घोडयास बांधून तेथून गांवांत आलों. गावांत शिरतांच उजवे बाजूस हल्लीं मसीदीसमोर जी जागा व फाटक वगैरे बंदोबस्ताची झालेली आहे त्या जागेवर एक झोपडीवजा घरटें असून तेथें एक म्हातारी बाई रहात होती, ती बहुतेक मरण्याचेच तयारीत असावी असें वाटलें. सदर बाईस मी विचारलें कीं येथें एक साधूमहाराज राहातात ते कोठें आहेत ? तेव्हां सदर बाई म्हणाल्या "कीं ते ह्या मसिदींतच राहतात व ते आतां परसाकडेला गेले आहेत" मी पुन्हाः विचारिलें त्यांना यावयाला किती वेळ लागेल. त्यावर ती बाई म्हणाली तें कांहीं सांगतां येणार नाहीं.माझे मनांत आलें कीं हे साधू हिंदुधर्माचेविरुद्ध मशिदींत कसे राहतात ? नंतर मनांत असेंही आलें कीं कदाचित् ते मुसलमान अवलीया असतील.तेव्हां त्या म्हातारीस पुन्हां विचारिलें कीं त्यांना ओळखावें कसें,त्यांचे अंगावरील चिन्हें कसीं आहेत?

त्यावेळेस तिनें सांगितलें कीं त्यांचे आंगांत पांढरी कफनी डोक्याला फडके हातांत एक टमरेल अशी त्यांची मूर्ति व ती रंगानें गोरी अशी आहे व ते आत लौकरच येतील. कदाचित् येण्यास वेळ लागला तर त्यांच्यासाठीं मी भाकरी व झुणका केला आहे तो ते इकडे तिकडे कुठें जरी गेले तरी तो मी त्यांस पाहून खाऊं घालतें. मनांत विचार आला कीं बाई म्हातारी—मला पक्कें आठवत नाहीं—पण ती ६० वर्षांचे वरच वयानें असावी. अगदीं थकलेलीच होती. तिनें बुवांचें एकंदर वर्णन सांगितलेलें तें मुसलमान रितीचें. मराठ्याची बाई त्यांच्यासाठीं भाकर करून असतील तेथें नेऊन देते हें कसें? असामी मला तर पुढें जाण्याची घाई होती व घोडाही गांवाबाहेर होता.बुवा केव्हां येतात कोण जाणें या विचारांत असतां मशिदीपाशीं गेलों त्यावेळेस मशीद हल्लीं सारखी उत्तम नव्हती. ती मोडकळलेलीच व आवारांतही बराच कचरा वगैरे होता. मात्र आंतील भाग स्वच्छ होता; आंत एक धुनी समोर खूपच झेंडू ( गेंदाचे ) फुलाचे जुने नवे हार कोंपऱ्यांत कांहींसे होते. मडकें व जातें ( दगडी ) धान्य दळण्याचें आणखीही कांहीं जिनसा तेथें होत्या; पण आतां त्या सर्वांची तितकी आठवण नाहीं. जातें धान्य दळण्याचें हें येथें कसें ते असावयाला काय कारण, कोनाड्यांत २-३ दिवे दक्षिणे कडेस तोंड केलेले सारखे जळत होते. दिवसा दिवे मशीदींत तेही गोडें तेलाचे अशा बऱ्याच विस्मय-कारक गोष्टी नजरेस पडल्या. बराच वेळ महाराजांची वाट पाहिली व मनास वाईटही वाटलें कीं, ही म्हातारी जें रूप सांगते तें रूप धारण करणारे तर खरोखर मला गांवांत शिरतांना प्रथमच भेटले. पण त्यांना मी ओळखलें नाहीं व त्यांस विचारतां लोक बाह्यशब्दांनीं त्यांनीं माझें ताडण केलें व मीही त्यांना मनांतलेमनांत बरेंच दूषणही दिलें. वाईट केलें. पण आपणांस ठाऊकच नव्हतें मग आपला तरी काय इलाज.नंतर परत येण्यास निघालों.त्या ठिकाणीं आलों तों श्री माझे घोड्याबरोबर कांहीं मुखानें पुटपुटत होते व त्याचे तोंडांत एक हात घातलेला व एका हातानें त्यास गोंजारीत व थपडही मारीत होते. मी दुरून हें पाहून मोठ्यानें ओरडलों कीं महाराज आपणाला तो इजा करील.

आपण बाजूस झालांत तर बरें; नाहीतर तो चावेल अगर दुगाण्या झाडील असें म्हणून मी अगदीं जवळ गेलों. पायावर डोकें ठविलें व स्वस्थ उभा राहिलों. तरी त्यांची क्रिया सारखी सुरु होतीच. पुढें मी महाराजांस म्हटलें की, "मोक्ष गुरु कोठें व कसला लाभेल." त्यावर श्री म्हणाले "कळेल पुढें तूं कोठून आलास ? मी तर वेडा फकीर आहे." मी स्तब्धच उभा होतों. मात्र त्यावेळेस काय व कोठें कसें जग आहे यांचें चित्र पुढें नसून एव.च विषय मनांत वसत होता. इतक्यांत महाराज म्हणाले "अरेपांच वर्षांनीं कळेल बरें बरं तर तूं आज जा उपास बी कर" पुढें कांहीं बोलणें वगैरे झालें नाहीं. मी व महाराज परत मशीदींत आलों. कोणी एका इसमानें नारळ आणला होता तो त्यास फोडण्यास श्रीनीं सांगितला. त्यानें तो फोडून श्रीसमोर ठेविला, त्यापैकीं अर्धा नारळ मला प्रसाद दिला, मी तो घेतला; तरी पण मनांस असें वाटे कीं साधुपुरुष केव्हां कसे बोलतात तें कसें कळेल इत्यादि विचार, मशींद, तेथील एकंदर स्थिति व श्रींची वागणूक या संबंधें विचार सुरु होतेंच. इतक्यांत श्री म्हणाले, "अरे एकदम भाकरी कसी पोटांत जाईल जा आपण पांच वर्षांनी पाहूं. अस्तु." मी वंदन करून तेथून निघालों व घोडयासह कोपरगांवास श्रीगौतमीमाईचें स्नान करून तीर्थ विधि वगैरे केला. तेथें श्री लक्ष्मी-नारायणाचे देवळांत आमचे मंडळींनी तळ दिला होता. ती सर्व मंडळी भेटली. त्यांचे बरोबरच पुढील विधी वगैरे सर्व झाला. १-२ दिवस राहून पुढें मंडळीसह निघालों. झालें पुढें १-१॥ वर्ष शिर्डीच्या झालेल्या हकीगत संबंधें व श्रीचे संबंधेंही मुळीं आठवणच आली नाहीं व त्या बाबतींत पुन्हां विचारही केला नाहीं. पण १९०६ सालांत पुन्हां अवचित योग दर्शनाची आला व त्याच खेपेस श्रीनीं "या शामदास आलेत बरें झालें. घोडा बैल चावका। आम्हासी भेटतो पाव का॥" इतकेंच म्हटलें. मग याद आली, वाईट वाटलें. आपण हरिहर बुवांना शिवडीस विचारलें व त्यांनीं सांगितलें कीं याच नांवाचे गावीं ती शिवलीही शिरडी—जुळलें. व बहुत आनंदी झालों. व स्वस्थ बसलों. १९०६ सालांत मी दर्शनास गेल्याबरोबर "या शामदास" असें श्री म्हणाले याचा लवकर बोध होईना: पुनः पुन्हां श्री हेच म्हणत.

"अरे शाम कळेल जरा नीट पहा" तरी पण लक्षांत येईना. दुसरे दिवसी सुमारें ३।३॥ वाजतां जवळ बसलों होतों. तेव्हां श्री म्हणाले, "आपुन लई दिवसाचे मैतर आहोंत बर का शाम." १९०४ ते श्रीचे समाधी पावेतो एकंदर ६ वेळ माझें शिर्डीस जाणें झालें तेथें ही फार दिवस असें रहाणें दोन वेळेसच (एक लो० टिळक आले त्यांचे आदले दिवशीच मीही श्रीक्षेत्र काशी येथील यात्रा करून आलों होतों. तेव्हां बरोबर कांहीं मंडळी होती. माझा त्यावेळेस २३ दिवस मुक्काम होता व पुन्हा एका खेपेस श्रीनाथद्वारा यात्रा करून आलों त्यावेळेस २० किंवा २१ दिवस होतों ) बाकी ४ वेळे पैकीं पहिली मुलाखत केवळ ४-५ तासांची होती. दुसरे वेळेस ८-९ दिवस; तिसरे वेळेस १०।११ दिवस; चवथे वेळेस तर आलों सकाळी व त्याच दिवशी संध्याकाळींच श्री म्हणाले, लौकर जावें व श्रीनी नश्वर देह सोडल्यावर एकदां गेलों हातों. ज्या वेळेस मी कांहीं मंडळीसह गेलों होतों त्यावेळेस एक प्रकार घडून आला तो पुढील प्रमाणें:–सुमारें दुपारचे ३-३॥ वाजण्याची वेळ असेल. श्री दळत बसले होते व कांहीं थोडें दळण झालेंही होतें. कांहीं थोडीशी गायना सारखी वाणी तर कांहीं वेदांत तर कांहीं शिव्या असे चाललें होतें, अशा स्थितींतच मी गेलों. खालीं बाजूस उभा राहून ऐकत राहिलों नंतर ७-८ इसम एकदम वर गेले; त्यावेळेचे आधीं कांहींही नव्हतें. शांत चित्तनेंच सर्व श्रींचे व्यवहार चालले होते; पण लगेच श्रीनीं उग्ररूप धरलें. व मशीदींत वर चढलेल्या मंडळीना खालींच यावें लागलें. सुमारें १५-२० मिनिटें झाली, लगेच श्री शांत झाले व सर्व मंडळी मशिदींत गेली. मीही गेलों, लांब धुनी जवळचे खांबा पाशीं बसलों. तेथून श्रीनीं हांक मारला "अरें शाम इकडे ये" पण माझें लक्ष जात्याकड असल्यामुळें मला ऐकूं आली नाहीं. जवळचे मंडळीनी मग मला विचारिलें कीं श्री हाक मारित आहेत ऐकलेंका. पुन्हां श्रीनीं हाक मारिली, अरे शामदास इकडे येथें असा जवळ बैस. श्रीचे उजवे बाजूस, जेथें बडे फकीर बाबा बसत तेथें त्यावेळेच्या खेपेस बडे बाबा

श्रीचे सानिध्यांत नव्हते त्य वेळेस श्रीसन्निध सेवेंत सौ लक्ष्मीबाई, तात्यापाटील, बापु साहेब जोग, बाळा शिंपी, माधवराव देशपांडे व इतर मंडळी होती. मी जरा दूरच पण उजवे बाजूस बसलों. श्रींनीं आपल्या अमृतमय करानें माझा हात ओढून अगदीं जवळ घेऊन म्हणाले " अरे लांब कशाला बसावें, जवळ बसावें. गोड बोलावें बरं. खरोखर धन्य भाग्य त्यांचे कीं ज्यांना निरंतर श्रींचें सानिध्य, श्रीची सेवा, श्रीजवळ बसणें हे योग अनुभवण्यास मिळाले असतील, ज्यांना अमृत मय वाक्सुधा अखंड प्राशन करावयास मिळत होती. " मी म्हटलें बाबा तुम्हीं मला समक्षतर फार दिवसांनीं बोलावितां असें कां ? त्यावर श्री म्हणाले "अरे तूं तर दर १५ दिवसांनीं माझेजवळ येतोस व थोडावेळ राहातोस; अन् म्हणतोस बोलावित नाहीं. मला ह्या म्हणण्याचा अर्थ कळेना, मी म्हटलें बाबा उगीच कांहीं तरी म्हणतां झालं. ह्यावर श्री तेथील एका समोर बसलेल्या इसमास म्हणाले, कारे हा दर १५ दिवसांनीं येतो ना तूंच सांग बरं. मला इतकें कांहीं पुरेसें आठवत नाहीं पण ते गृहस्थ शिंपीच आसावेत. मग उलगडा माझ्याच मनानें झाला कीं दर महिन्याचे प्रत्येक एकादशीस श्री चरणीं गाऱ्हाणें व पत्र टपालनेंच सतत पाठविण्याचा माझा नियम श्रीचेकडेस होता. ६ वे खेपेस मी ज्यावेळेस श्रीकडेस गेलों त्या वेळेस मला पक्कें आठवतें कीं पुढें मी श्री बाबाना प्रश्न केला कीं " बाबा हें जातें कशाला ठेवलें आहे व दळावयाचें हें काय कारण असावें. आपण दळतां कां ,बरें " यावर श्री म्हणाले "इथें जे येतात त्यांचं मला दळावं लागतं बर " अहाहा ! काय ही वाक्यें कीं आमच्याकरितां श्रीना किती कष्ट पडतात आमची संचित क्रियमाणेंही चक्रासारखीं फिरत असून व आम्हांस होणाऱ्या यातना व इच्छादिक सर्व क्रिया यांचे पायीं आम्हा मानवांसाठीं सद्गुरूस शिणणें पडतें हेंच खरें. पुनरपी जनन मरणाचा फेरा चुकविण्याची शक्ति एका सद्गुरुचेशिवाय कोणासही नाहीं. व संत कसे ॥ रामकृष्णहरी जसें ॥ अनंताच्या ॥ मूर्ती भगवंताच्या ॥ कलीमध्यें अवतरल्या ॥ संतजे करतील तें देवा-

सही करतां येणार नाहीं हेंच खरें होय. मी निरोप मागावयास गेलों त्यावेळेस दुपारीं ३।३॥ चे सुमारास श्री स्मश्रु करावयास बसले होते २।२ माणसें जवळच पण जराबाजूस होतीं. त्यांनीं वर जाऊं नका बाबा रागावतील असें म्हटलें. इतक्यांत १ इसमपुढें श्रीना नमस्कार करण्यास गेला व मी जातों असें तो म्हणाला. त्यांस असा कांहीं श्रींनी एक हाताचा तडाखा दिला कीं त्याचेंतोच जाणे व श्री त्यास म्हणाले कोणी बोलाविलें होतें. झालें श्रींची स्मश्रूची क्रिया तर बाजूसच राहिली पण त्यांची नरसिंहमूर्ती मात्र जास्तच खवळलेली दिसली. त्या स्थितींत बाजूस बसणाऱ्या २।२ जणांनीं मला आपणाकडे येण्यास खुणाविलें. मी जवळ गेलों व काय म्हणतां म्हणून विचारलें; त्यावर त्यापैकीं एक म्हणाला पाहिलेना आम्हीं सांगत होतों तें खरें पटलेना? तेव्हां श्री खूपच रागावलेले; खांबावर सोट्यानें तडाके मारण्याची क्रिया चालली होती, शिव्या आदि सर्व जोरांतच होत होत्या. पण मी तसाच पुढें गेलों व श्रीचे चरणीं भाल ठेविलें व म्हटलें "बाबा जातों." उदी देतांना त्यावर त्यांनीं न रागावतांच उदी देऊन प्रेमानें सांगितलें "जावें." एवढा अनावर संताप असतांही, श्रीप्रभुगुरुरायाची ती उग्रमूर्ती एकदम शांत होऊन जसी कनवाळू माता आपले अर्भकांस कधींही रागावून ताडण करित नाहीं त्याचप्रमाणें बरें "शामदासा जातोस; पुन्हां कधीं येणार" असें म्हणाले.किती प्रेमाचे मधूर शब्द हे. १ सेकंदांत एवढा ( आम्ही मानवी दृष्टीनेंच म्हणतों ) क्रोध आलेला एकदम कसा शांत झाला, ज्यांनीं काममदादिकांना आपले अंकीत केलें, त्यांच्या ह्या रागाचें कांहीं तरी त्यांत उद्दिष्ट हेतु निराळेच असतील. अगाध लीला गुरु तुझीरे नकळेही मजला । कैक तारले कैक तारसी ह्या मायेच्या पुराला " ह्या वाक्याप्रमाणेंच होय.उदी घेतली व बाबा लौकर पुन्हा बोलवालना असें मी म्हणतांच बाबा म्हणाले अरे मी तर तुझ्या संगेंच आहे बरें अल्ला राम माळीक भले करिल बरें ॥ पदीं भाल ठेवून निघालों, मसिदीच्या फाटकापाशी गेलों व पुन्हा श्रींनीं हाक मारली. मी पुन्हा वर गेल

"अरे" श्री म्हणाले "आतां आपल्याला शिर्डीस यायचं नाही बरं. मी तरी तुझ्या संगच राहीन बरें ॥ तूं काळजी नको करूं बरं ॥ इथ लई लोक खराब झाले ॥ अक्षि सतावतात ॥ पै पैका मागतात ॥ पुन्हा बेमान होतात ॥ आपण आतां कंटाळलों बरें ॥ बरं पण तूं आतां यात्रेला जाणार का मंडळीला भेटणार ? मी म्हटलें अद्याप कांहीं ठरलें नाही. बरं तर जा पंधरा दिवसांनी बी आतां येऊं नको, मी तुझ्याबरोबरच आहें व राहात जाईन बरं. तिथंच सगळं बोलावं ॥ या म्हणण्याचा अर्थ मला त्या वेळेला मुळींच कळला नाही. उदी घेऊन पुढील मार्गास लागलों व त्या सालीं श्रीनीं आपलें नश्वर मानवी कलेवर सोडलें अर्थात सगुणाचे निर्गुणांत गेले. माझी काया गेली खरें । परि मी आहें जगदाकारें ॥ अशीच वाणी महाराजअनुभवाला आणून देत. श्रीनीं समाधी घेतली त्या आधीं १।२ दिवस दृष्टांत झालेला होता व संदेश आलेला होता. त्याबद्दलची हकीगत कांहीं मंडळीस मी आधीं कळविलेलीही होती. श्रीसमर्थांनी सांगितलेलीं वाक्यें कीं आतां आपल्याला शिर्डीस येणें नाहीं" त्याप्रमाणे जाणेंही पुढें झालेंच नाहीं मात्र पुढें कांहीं दिवस पत्रें पाठविणें वगैरे होत असे. पण श्रीनीं समाधी सुखस्थानांत प्रवेश करण्याचे आधींच— त्याच सालाचे श्रावणमासापासून पत्र लिहावयास बसावें कीं कांहीं तरी व्यत्यय यावा. असें दोन एकादशा श्रावणाच्या टळल्या. मग श्रीवाक्यांची आठवण आली कीं, "पंधरा दिवसांनीं बी आतां येऊं नको मी तुझ्याबरोबर आहेंच व राहात जाईन तिथेंच सगळें बोलावं" व पुढें हीं पत्रें गेलीं नाहींतच. आगाऊच एक वर्षा आधीं सूचना कशी व कोणत्या शब्दांनी ते देत असत हें कळणेंच अशक्य होय, असें जर आम्हां मानवांस कळतें तर मग काय पाहिजे. मात्र ज्यांसीं हें कळावेंसें वाटत असेल त्यांनीं—"सद्गुरुतें नित्य काळ प्रेमें तूंची ध्याई" आपापल्या चिद्शक्तीस आळवावें" श्री नेहमीच बहुधा म्हणत कीं, "ज्याचें त्याचें त्यांनींच पहावें व धरावें."

शेवटीं विनवणीरूपानें श्रीसाईशगुरुचें परमपदां पाशीं मागणें करून क्षमस्वपरमेश्वर । प्रसीद परमेश्वर ॥ बहु मी अन्याई । परी सकलही लाज

तुजला ॥ अशी विनंती करून आर्यासप्तकांतील शेवटील आर्या त्यांची त्यांनीच करवून घेतलेली इथें पुन्हा नमुद करीत आहें—

बाबा अगाध लीला वर्णाया उद्धवेश हा थकला ।
तनमनधन तूझेंची ॥ सर्वपरीनें तुलाच हा विकला ।
श्रीगुरुसाईश चरणार्पणमस्तु ॥

भवदीय श्रीउद्धवेश
उर्फ
श्रीसाईसुत शामदास

॥ अगाध लीला तुझी गुरूरे नकळे ही मजला ॥

श्रीसद्‌गुरु साईराजाचे कृपेनें पश्चिम दिशेकडील श्रीक्षेत्र द्वारका, बेट द्वारका नारायण सरोवर, सुदामपुरी, पोरबंदर, जुनागड, गिरनार, प्रभासपट्टण, सोरटी सोमनाथ, सिद्धपूर, मातृगया डाकोर आदिक्षेत्र यात्रा सर्व यथायोग्य घडल्या. वरील सर्व क्षेत्रयात्रा करून परत येण्यास २ । ३॥ महिने लागले. वाटेंत जुनागड येथें ( श्रीगिरनार पर्वतावर ) श्रीसद्‌गुरुरायांनी मी तुझे बरोबर असतों या त्यांच्या वाणीचा प्रत्यय दिला. श्रीगिरनार पर्वतावर श्रीदत्तात्रय प्रभूंचे वस्तिस्थान पादुका आहेत व सदर पादुका त्या पर्वतावरच्या शिखरावर असून तेथील ३० । ४० पायऱ्या अत्यंत बिकट आहेत, बाकी एकंदर सर्व पायऱ्या उत्तम बांधल्या आहेत, सदर गिरनार पर्वतावर मी व आमचे बरोबरची मंडळी चढून गेलों. चढण्याचा आरंभ सकाळीं उशीरांच झाला. तरी पण सर्वांचा निश्चय झाला होता कीं आज गुरुवार असल्यामुळें श्रीप्रभुसाई-दत्ताचे चरणस्पर्श झाल्याशिवाय उपहार करावयाचा नाही आणि म्हणूनच असेंही ठरलें होतें कीं श्रीदत्तदर्शन घेऊन परत अंबाजीचे टेकडीवर येऊन मग तेथें कांहीं उपहार करावा. त्या प्रमाणें चढण्यास आरंभ होऊन अंबाजीचे टेंकडीवरील श्री मातेचें दर्शन घेऊन पुढें

गोरक्षनाथाचे शिखरावर जाण्यासाठीं सुमारें १००-१२५ पायऱ्या चढलो तेव्हां तहान अत्यंत लागली पहाडावर पाणी मुळींच नाहीं बरोबरचे मंडळी पैकीं माझे जवळ वृद्ध गंगारूप सौ० ताईबाई व जुनागड येथील पितांबर पंडया यांचा गुमास्ता असे होते. बाकीची मंडळी कांहीं खालीं व कांहीं वर असे आपापले शक्तिप्रमाणे पायऱ्या चढण्याचें काम करीत होतीच. पायऱ्या चढतां चढतां माझे घशास पाण्यावांचून कोरड पडण्यास लागली. जीव घाबरा होण्यास लागला तरी तसाच पुढें ३०-३५ पायऱ्या मोठ्या शिकस्तीनें चढलों; पण उन्हाचे त्रासानें घेरी येऊन मीं पडलों. पडतां पडतां जर मी उजवे बाजूस पडलों असतों तर पुन्हां माझें शरीर जगांत दिसलें नसतेंच पण तेथेंच राहिलें असतें. पण " मागें पुढें उभा राहे सांभाळीत ॥ आलीया आघात निवाराया ॥ पहा ही संतवाणी व मी नेहमीं तुझे जवळच आहे हे शब्द कसे खोटे होणार ! त्या वेळीं पंडयाचा गुमास्ता ७-८ पायऱ्या मागेंच होता. अर्थात मालकाशिवाय दुसरे कोण सांभाळणार ? मी पडलों तेव्हां पाण्या वांचून जीव गुदमरून तोंडास फेस आला. इतक्यांत सदर गुमास्ता व गंगारूप मातोश्री ताईबाई ह्या जवळ येऊन पोहोंचल्या व कपडयानें वारा घालीत बसल्या. गुमास्ता पाणी आणण्यास खालीं अंबाजीचे टाकीवर जाणार तितक्यांत एक वयोवृद्ध गोसावी पाण्यानें भरलेला तांब्या घेऊन तेथें आला व त्या उभयतांस म्हणाला, "ए बुढी, मा, छोकरेको ये पानी पिलाव, भला, पानी बिना कैसा होगा" उभयतांचे मनांत शंका उत्पन्न झाली कीं हा गोसावी, याचे हातचे पाणी कसें पाजावें, इकडे मी तर बहुतेक बेशुद्धच होतों. त्यावर गोसावी म्हणाला, "संकोच धरूं नका. त्याला हें पाणी पाज व आपण जवळ येऊन तांब्यांतील पाणी डोळ्यांस लावलें व डोक्याकडे उभा होता. वरून ऊन्ह प्रखर लागत होतें नाईलाजानें पाणी पाजलें तेव्हां जरा मी शुद्धीवर येऊन डोळे उघडून पाहतों तो एक गोसावीबुवा व हीं दोन माणसें जवळ आहेत सदर बुवा मला उद्देशून म्हणाले, बच्चा हें सर्व पाणी तूं पी. मला काम आहे, मी तुला परत येतांना भेटेन बरें. असें म्हणून तो बुवा गेला. वरतीं पायऱ्या अदमासें २४।३० पावेतों मला दिसत होता. त्याजवळील तें पाण

आमचे बरोबर असलेल्या पंड्याचा गुमास्था (नोकर) चे ताब्यांत घेतलें. मला साधारण चांगला शुद्धीवर येण्यास अदमासें पाऊण एक तास तरी लागला. मी शुद्धीवर आल्यावर तें सर्व पाणी पिऊन सर्व शरीर पाहिलें, तों पायऱ्याचा घसरा मांडीला व हाताचे कोपऱ्याला जास्त लागलेला होता. बाकी सर्व खरचटलेलें होतें. मातोश्री ताईबाई व गुमास्ता यांसी सदर बुवा कोण वगैरे विचारतां तुम्ही पडलांत व सुमारें १५।२० मिनिटांनी हा बोवा आला. त्यांनीं वरील वाक्य उच्चारलें. बरोबरच्या मंडळीस कांहींही वाटो व वाटलें असेल, पण मी त्यांचे तोंडून ही हकीगत ऐकल्या बरोबर उरलेले सर्व पाणी पिऊन गेलों. माझी भावना पूर्णपणानें अशी झाली कीं, श्रीपरमदयाळु गुरुमायच माझी मला भेटली. व तिनें तें जीवन पाजलें. धन्य त्या साईमाउलीची कीं कुठें शिरडी व कुठें गिरिवर–गिरनार! पण तें सुख किंवा ती वेळ किंवा तो बोवा यांचें वर्णन लिहिणें किंवा करणें अशक्यच होय. सदर गोसावी यानें पुन्हां भेटण्याविषयीं आश्वासन दिल्यामुळें श्रीदत्तात्रयाचे पादुकांचें दर्शन वगैरे सर्व उरकून ३॥-४ चे सुमारास परत त्या ठिकाणीं आलों व ५।-५॥ वाजे पावेतों वाट पाहिली. पण तो गोसावी कांहीं भेटला नाहीं व तेथें मी एकटा असतों तर राहिलों असतों पण बरोबरची मंडळी कंटाळली व पाठी मागें त्यांनीं लौकर सूर्यास्ताचें आंत खालीं उतरून जुनागड गांवांत जाणें जाहलें पाहिजे असा तगादा लावला. सर्व मंडळी उपासी. तेव्हां नाइलाजानें तीच अस्पष्टमूर्ती गोसावी बोवाची व तीच त्याची वाणी आंतल्या आंत घोळत रात्रीं ७।८ चे सुमारास बिऱ्हाडीं खिन्नतेनें आलों. चैन पडेना. जेवण वगैरे सर्व आटोपलें; पण मला पाणी पाजणार पुन्हा न भेटल्यामुळें असें कसें झालें हें कोडें न उकलतां मी रडतच तसाच अंथरुणावर पडलों सुमारें ४।-४॥ पहाटेची वेळ असेल. स्वप्ना सारखा भास, पण आवाज स्पष्ट, श्री. बाबांचा झाला कीं "अरे शामदासा असा रडूं नको लई काम आहे, हें पुढें कळेल बरें, उठ," अस्तु. पुढें वरील सर्व क्षेत्र यात्रा करून आलों. ज्या इसमानें द्वारकेस इनशुअरन्सनें पन्नास रुपये पाठविले ते कै० भाई गोपाळ गिरधर यांची गांठ पडली. सर्व गोष्टी भेटी जाहल्या व सहज मी त्यास रुपयांबद्दल विचारलें कीं रुपये मला पाठविण्याची

प्रेरणा तुला कशी झाली. तेव्हां त्यानें खालीलप्रमाणें सांगितलें. "ज्या दिवशी मी आपणास रुपये पाठविले त्याचे आदले दिवशीं रात्रीं ११॥ वाजण्याचे सुमारास माझे स्वप्नांत ज्याचे अंगावर एक स्वच्छ कपडा असा एक बुवा आला व मला हालवून म्हणाला, "अरे तुझ्या बापास द्वारकेस पैसे नाहीत ते तूं पाठव. मी जागा झालों पाहातों तों कोणी नाहीं. १।१॥ तास विचार केला हें काय पण कांहीं समजेना पुढें पुन्हा झोंप आली. पुन्हा तोच बुवा पण फार रागावलेला दिसला व मला पुन्हा हालवून जागें केलें. वरील रुपया बद्दल पुन्हा बजावलें. मी जागा झालों व माझे कुटुंबास म्हटलें मला हालवून एक बुवा जागें करतो व तूं तशीच निजतेस असें म्हणून आम्ही उभयतां उठून घरांतील दरवाजे पाहिले तों बंदच. मग मला आपलें स्मरण झालें आणि आपल्याला कदाचित कांहीं पैशाची अडचण आली असेल असें वाटलें. त्या नंतर माझ्या मनाची इतकी उत्कंठा वाढली कीं दिवस उजाडतो केव्हां आणि मी रुपये पाठवितों केव्हां. दुसरे दिवशीं मी रक्कम इनशुअर करून पाठविली." सदर रुपयांची हकीकत श्रीसाईलीलेंत मागें प्रसिद्ध झालीच आहे. पुढें मी श्रीचे दर्शनास शिर्डीस जाण्यासाठीं निघालों. कोपरगांवच्या स्टेशनवर आलों तेव्हां शिर्डीचे दोन्ही टांगे भरून गेले होते. कोपरगावचा टांग्यांत बसून कोपरगांवापर्यंत आलों.श्रीदत्ताचे मंदिरा जवळील श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिरांत सामान ठेवलें व श्रीगौतमी गंगेचें स्नानादि विधी केले.इच्छा ही कीं संध्याकाळ पावेतों शिर्डीस पोंचावें कोपरगांवचे टांगेवाले सर्व १ स्वारीचे ५ रुपये मागावयांस लागले; पण माझी तयारी १॥–२ रुपया पावेतों देण्याची होती. ३ वाजेपावेतों पुष्कळ यत्न केला पण कांहीं टांगा मिळेना. स्वतः श्रीदत्ताचे देवळाचे ओट्यावरच बसलों. इतक्यांत कोपरगांव स्टेशनावरून २ स्वारी असलेला टांगा देवळासमोर सुटला. त्यांतील एक इसम माझे ओळखीचा निघाला विचारपूस करतां शिर्डीस मलाही येणें आहे पण वाहनाचें साधन बंद यामुळें अडकून पडलों आहे असें म्हणालों. अनायासें टांग्यांत आणखी एक स्वारी मिळाली व मी व माझे परचित व अपरचित गृहस्थासह पुण्यभूमी गुरुमाउलीचें वस्तीचे गांवी आलों. टांगेवाल्यास मी ३ रुपये देऊं लागलों– तेव्हां त्यानें त्यांतील १॥ रुपया मला द्या, मला जास्त नको असें म्हटलें व दी

रुपया घेतला. श्रीतुकाराम महाराजाचे म्हणण्याप्रमाणे आम्ही जी जी इच्छा करूं ॥ तें तें कल्पतरू पुरवितसे ॥ शिर्डीस सुमारें ४।४॥ वाजतां पोहोचलों. सामान काकासाहेबांचे वाड्यांत ठेवून धूळ दर्शनास श्रीचेकडेस गेलों, त्यावेळेस गुरुमाउली व कै० बाळासाहेब भाटे, बापूसाहेब बुटी व इतरही भक्तमंडळी बरीच तेथें बसलेली होती. मी वर मशिदीच्या पायऱ्या चढत असतांच मागाहून माधवराव देशपांडे हेही आले. श्रीसद्गुरुकडे मी वारंवार जात नसल्यामुळें माझ्या परिचयाची मंडळी फार नव्हती. ज्यावेळेस श्रीची आज्ञा येईल त्या त्या वेळेस मी जात असें. कधीं दृष्टांत रूपानें व कधींपत्रानें श्री बोलावून घेत असत. अण्णा चिंचणीकरही माधवरावांचे मागाहून सहकुटुंब आले. माधवराव देशपांडे यांनीं श्रीस सांगितलें कीं देवा, बेटांतील शामदास हा तुझे दर्शनास आला आहे. श्री त्यावेळेस प्रसन्न चित्तानेंच मजकडे पाहत असून बडे बाबांचे हातांत चिल्म देत होते. श्रीचें वाक्य “ अरे मी तर लई त्याला पाहिलें व पाहतों. क्या दर्या में पैसा डुबा अल्ला मालीकनें कैसा दिया। पानी बी पीलाया ॥ ” इतकी श्री वाणी निघाली. काय त्या वेळची ती माझी गुरुमाउलींची वाणी, ती खुणगांठीचीं, वाक्यें ऐकल्याबरोबर ह्या वेड्या उद्धवेशासाठीं बाबा तुला किती कष्ट पडतात व पडतील, गुरुमाय मी कवण्या रीतीनें उतराई होऊं असें मनांत म्हणून पायावर माथा ठेवला. पुढें सुमारें १५।२० मिनिटांनीं श्री बाबानींच डोकें हालविलें व पायावरून उठ शामदास, बैस तिथें, वाड्यांत जा. मी तेथें फेरीस श्रीनिघे पावेतों होतों. श्रीची संध्याकाळची फेरी झाली. वाड्यांत आलों. त्यावेळेस श्रीमान् काकासाहेब दीक्षित नव्हते, पुढें बापूसाहेब जोग हे रात्रीं ८ चे सुमारास आले व चला जेवणास, तुम्ही येथें असे पावेतों आमचेकडेसच जेवावें असें बोलले. त्यावेळेपासून मी तेथून निघे पावेतों २ वेळ जेवलों व तें बापूसाहेबाकडेसच. इतर मधल्या वेळचें बसणें वगैरे काकासाहेब यांचे वाड्यांत श्रीमंत बापूसाहेब बुटी यांचे सान्निध्यांत प्रेमळ भाषणें, बाळासाहेब भाटे वगैरे मंडळीसह होत असत. तेथें असे. दुसरे दिवशीं सकाळीं प्रथम श्रीदर्शनास गेलों, श्री लेंडीवर जाण्याचे तयारींत दिसले; दुपारीं पूजे करितां गेलों. दक्षिणा ११ रुपये

मागितली. अशी दक्षणा रोज १० दिवस पावेतों मागितली व तीही श्रीचे कृपेनेंच १० दिवस पुरेशीजवळ होती ती दिली. ११ वे दिवशी ११ रुपये रोजचेप्रमाणें दक्षिणा मागितली पण मजजवळचा पैसा सर्व संपला तेव्हां मी श्रीस विनंती केली कीं बाबा आतां मज जवळ पैसा मुळींच नाहीं आतां ११ रुपये कोठील देऊं हीं दश इंद्रियें व मन आपणास अर्पण आहेत यावर श्री म्हणाले कीं हें तर माझेंच आहे. तूं कोण देणार ? केव्हांच घेतले आहे. मी स्वस्थ बसलों. जा बापूसाहेब बुट्टीकडे व माग ११ रुपये व दे मला. त्याप्रमाणें मी उठलों व मशिदी खालीं उतरलों व मशिदींतून बाहेर पडणार तों श्रीनीं हांक मारली " अरे शाम इकडे ये. तूं ११ रुपये जे आण-णार ते दुपारूनच आण व तें बापुसाहेब जोग यांचेकडूनच आण.मात्र ते रुपये ११ तूं तर घे पण बापूसाहेब जोगालाही बरोबर घेऊन ये.बरें बैस.आतां पुढें आरती वगैरे सर्व मंडळींचीं दर्शनें उदी प्रसाद झाला. जेवण्यास मी वाडयांत जावयास निघालों. मशिदी बाहेर पडलों व श्रीमाल्कांनी ११ रुपये मागितले, हेंही विसरलों. पुढें जेवणखाण आटोपलें, व मी दुपारीं ३–३॥ चे सुमारास पुन्हा दर्शनास गेलों. जरासा बसलों तों पुन्हां श्रीनी ११ रुपये मागितले. नाहीं म्हणतां. जा बापूसाहेब जोगांकडे व ते ११ रुपये घेऊन त्यालाबी बरोबर घेऊन ये. असें म्हणाले. मी बापूसाहेब जोगाकडे गेलों. त्यावेळेस बापुसाहेब जोग हे श्रीएकनाथी भागवत वाचीत होते व दुसरे २ । ३ इसम तेथें ऐकत बसले होते. मी बापुसाहेब जोगांना म्हटलें श्रीबाबांनी ११ रुपये मागितले आहेत. ते त्यावर बापुसाहेब जोग म्हणाले कीं जा बाबांना नमस्कार सांग. मी त्यावर म्हटलें श्रींची आज्ञा ११ रुपये घेऊन तुम्हांसह यावें अशी आहे असें सांगितलें त्यावर ते म्हणाले बसा मी तेथें बसलों. त्यांचें भागवत वाचन संपलें. व उभयतां संध्याकाळचे फेरीचे जरा अगोदरच आम्हीं गेलों पण श्री कांहींच बोलले नाहींत. मी नमस्कार केला श्रीनी वरदहस्त मस्तकावर ठेवला व बैस जा म्हटलें.पुढें श्रीसंध्याकाळचे फेरीस निघाले. उदी वगैरे घेऊन मीही सर्व मंडळीसह मशिदी बाहेर पडलों.त्यारात्रीं चावडींत श्रीचे शयनाचा वार होता. तो

सर्व सुखसोहाळा व श्रीची नयनमनोहर ध्यानमुर्ती व आनंद ज्यांनी अनुभवला असेल त्यांनाच तो ठाऊक. इतरांस कल्पना व्हावयाची नाहीं. त्यानंतर २ दोन ३ तीन दिवस मी ज्या वेळेस दुपारीं ३।३॥ वाजतां श्रीकडेस जावें त्या वेळेस ११ रुपये दे असें म्हणत व मजकडे नाहीं म्हटलें कीं बापुसाहेब जोगांकडेस जा म्हणत. पण यांत असें कां सांगतात व या ११ रुपयाचा काय कुठें संदर्भ आहे याचा उलगडा झाला नाहीं व मीही तितका विचार केला नाही. मात्र ह्या २।३ दिवसांत पूजेच्या वेळेला किंवा इतर वेळेसही श्रीनी दक्षणा मागितलीच नाहीं. दुपारीं ३।३॥ चे वेळेस जावें कीं आण ११ रुपये असें म्हणावें नाहीं म्हटलें कीं जा बापूसाहेब जोगांकडे असें म्हणावें. ४ थे दिवसीं आम्ही ( बापुसाहेब जोग व मी ) पोथी आटोपल्यावर गेलों. दर्शन वगैरे झालें. जवळच बाजूस मी व जोग बसलों. ती संध्याकाळची वेळ. बरीच मंडळ श्रीचे सान्निध्यांत असून जो तो आपापले परी सेवा करीतच होता, श्रीसहज जोगांना म्हणाले आज किती रुपये वाटले ? त्यावर त्यांनीं ६१ रुपये वाटले असें म्हटलें. त्यांत श्रीमंत बापूसाहेब बुट्टी यांना आज ५० रु० व उद्धवेश बुवाला ११. या बुवांना आज ४ दिवस झाले रोज ११ प्रमाणें श्री आज्ञेवरून देत आहें. मला श्रीनी विचारलें काय तुला ११ रुपये मिळाले ना ? कांहीं वेळ मी कांहींच बोललों नाहीं. पण पुन्हा श्री म्हणाले कायरे ११ तुला तुझे मिळाले ना ? तेव्हां मी लगेच होय म्हणून उत्तर दिलें. इतकें म्हणालों त्यावर श्री म्हणाले नाहीं उद्यां पाहूं बरें मात्र पोथी बी पहा. संध्याकाळची श्रीची फेरी वगैरे सर्व झाली मी मात्र विचारांत गुंगत्त झालों. पुढें चितांवर हेडमास्तर व बाळासाहेब भाटे व मी असे तिघे माडी वरील पुढील सज्यांतील गच्चीवर श्रीलीलादिक गोष्टीच बोलत होतों. मला भाटयांनीं प्रश्न केला काय हो ११ चा संबंध काय आहे व तुम्हास तें काय कसें पावलें ? मी त्यास म्हटलें कीं त्या बाबतीत मी मुळींच विचार केला नाहीं. पण मला राहून राहून हेंच आश्चर्य वाटतें कीं मी काय म्हणून होय म्हटलें व


त्यावर श्रीनी नाहीं उद्यां पाहूं मात्र पोथी बी पहा असें म्हटलें ह्या वाणीत काय गूढ आहे कांहीं समजत नाहीं. नंतर आजच जोगांचेकडेस श्री बुट्टी ५० रुपये घेण्यास येण्याचे आधींच असा संदर्भ बोलतांना निघाला होता कीं आपले आराध्यदैवत असें कधीहीं स्पष्ट सांगत नाहीं कीं आपण अमुकच करावें असें जोगाचें म्हणणें होतें. व माझें म्हणणें असें कीं जर आपली अढळ निष्ठा आराध्यदैवतावर असली तर त्यांस तसें तें करणें भागच आहे असें माझें तरी मत आहे व त्यांनीं तें स्पष्टरीतीनें सांगितलेंच पाहिजे व तें तें सांगतही असतात असें पुष्कळ ठिकाणीं घडून आलेलें आहे अशी माझी व जोगांची झालेली भाषा भाटे यांना मी सांगितली. त्यावर ते म्हणाले कीं बरोबर आहे व ह्या ११ रुपयांचेंही असेंच असलें पाहिजे. यावर बाळासाहेब भाटे म्हणाले श्री पुढें म्हणाले कीं उद्यां पाहूं मात्र पोथी बी पहा याचा कोठें संबंध लागतो व हे बोल कसे हो? तितक्यांत मला श्री द्वारका क्षेत्रांतील मी केलेल्या प्रतिज्ञेची आठवण झाली. मी द्वारकाक्षेत्र यात्रेस गेलों असतां समुद्रांत पैशाचें पाकीट पडलें व त्याच दिवसीं उदासीनतेंतच कांहीं पोथीचा अर्थ वगैरे लागेना. त्या वेळेस मी कुंटें व आठल्यांची ज्ञानेश्वरी वाचीत असें. पण अघातामुळें अशी प्रतिज्ञा केली होती कीं बाबांनीं आतां समक्ष सांगितल्याशिवाय पोथी पुराण वाचावयाचेंच नाहीं. द्वारका व इतर सर्व यात्रा करून श्रीचे कडेसच गेलोंही होतों पण पोथीबद्दल किंवा अशी सतत दक्षणा मागणें वगैरे त्यावेळेस श्रीनीं केलेंच नव्हतें. श्रीप्रेरणेप्रमाणें त्यावेळेस जी दक्षणा द्यावी ती घेणें होत असे व दोन तीन वेळेस त्या माझ्या राहण्यांत मी दक्षणाही दिली नाहीं व मजजवळ मागितलीही नाहीं.मात्र मी ज्ञानेश्वरी वाचणें बंद केलें होतेंच.त्यानंतर २-३ वर्षें पावेतों माझें शिर्डीस जाणें झालें नाहीं. मात्र पत्रें जात असत. एकदां चिंदाबर केशव गाडगीळ-मामलेदार यांना मी श्रीस निवेदन करण्यास पत्र पाठविलें होतें व त्यावर उत्तर काय पाठवूं असें त्यांनीं विचारलें.त्यावर त्याला इथें बोलावून घे लौकर पत्र पाठीव अशी आज्ञा झाली,त्याप्रमाणें गाडगिळांचें

मला पत्र आलें कीं आपली आठव श्रीनीं काढली आहे; व आपण लौकर यावें अशी आज्ञा आहे. पत्र आल्यावर ७।८ दिवसांनीच चरणीं सादर झालों. त्यावेळेस वर सविस्तर वर्णिलेला प्रकार महाराजांनीं घडविला व अखेरीस मला पोथी वाचावी हा इशारा स्पष्ट दिला. कुठें द्वारका, कुठें शिर्डी व केलेल्या प्रतिज्ञेस मध्यंतरी किती काल गेला व आम्हां मानवी जीवांना त्याची आठवण न राहणें व ती पुन्हां जागृत करणें या सर्व गोष्टींचा विचार केला असतां बाबांचें वास्तव्य एकदेशी नसून ते सर्वत्र व्यापक आहेत व त्यांची वायरलेस टेलीग्राफी किती विलक्षण आहे ह्याची खात्री पटते. योग्य संधी पाहून योग्य वेळीं ज्याची त्याला खूण पटवून देऊन त्याच्या उद्धाराचा मार्ग त्याला दाखवून देणारे श्री बाबा प्रत्यक्ष ईश्वर होत असें माझ्या बुद्धीला वाटतें. त्यांच्या लीला पाहून असे उद्गार निघाल्या वांचून राहात नाहींत कीं हे साई, हे नाथ, हे बाबा, तू धन्य आहेस व तुझी लीला ही आम्हां मानवी जंतूंना कळणें अशक्य होय. धन्य त्या साईच्या सहवासांत असलेल्या जीवांची कीं जे नित्य बोधामृत मिळून कृतार्थ झाले. अस्तु. मी बाळासाहेब भाटयांना सांगितलें कीं ही जी मी प्रतिज्ञा केली तिची पूर्तता आजचे श्रीचे वाक्यानें झाली असें मला आतां वाटते. पुढें रात्रीं ८-८॥ चे सुमारास मी व बाळासाहेब भाटे मशिदींत गेलों तेव्हां बाबा पाणी पीत होते. नमस्कार वगैरे केला. जवळ भक्तराज म्हाळसापती व २।३ माणसें दुसरीं होती. श्री बाळासाहेब भाटे यांना म्हणाले कायरे वाड्यांत बोलत होतां ? बाळासाहेबांनीं पदीं भाळ ठेऊन ते स्वस्थ बसले. जरा वेळ गेल्यावर तोच प्रश्न मलाही केला. मी म्हटलें बाबा, आज संध्याकाळीं आपण जी आज्ञा केली त्याबद्दल बोलत होतों. त्यावर श्री कांहीं वेळ स्वस्थच होते व एक गोष्ट सांगण्यास आरंभ केला ती गोष्ट खालील प्रमाणें. मात्र सदर गोष्ट वाचतांना हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं श्रीनीं जी सांगितला तिचा हा सारांश आहे. आधीं तर या गोष्टीस १२।१३ वर्षें झालीं आहेत. महाराजांच्या गोष्टीचें शब्दशः चित्र रेखाटण्याची माझी पात्रता नाहीं. श्रीसा-

ईलीलेच्या वाचकांपैकीं अगर श्रीचें दर्शन घेऊन कृतार्थ झालेली आबाळ-
वृद्धादि संतमंडळी यानीं सदर गोष्ट श्रीचे मुखांतून ऐकिली असेलही, तर।
मजवर कृपावंत होऊन ती त्यांनी श्रीसाईलीळा संपादकांकडे लिहून पाठवावी.
श्री म्हणाले, आम्ही २ भाऊ होतों. रस्त्यानें चाललों पुढें तो भाऊ रस्त्यानेंच
पुढें गेला त्याला जनावर चावलें तो मरून गेला. मी आपला हलके हलके
चाललों होतों इतक्यांत ५।६ आदमी आले व म्हणाले तो दुसरा भाऊ कोठें
आहे ? मी त्यांना म्हटलें त्याला जनावर चावलं तो मरून गेला. मी त्याला
कफन बी दिलं असं मी सांगितलें.तें त्या ५।६ लोकांना खरंच वाटेना.इतक्यांत
श्रीचे पाया पडण्यास २।३ इसम वर मशिदींत आले ते पाया पडले.श्री त्यापैकी
एकास म्हणाले, का रे बा. कुठून आलां, वरं झालं जा खालीं बैस. ती २।३
मंडळी खालीं मशिदीच्या गेली असें पाहिल्यावर मी श्रीस प्रार्थना केली की
बाबा त्या ५।६ लोकांस खरंच वाटेना पुढें काय ? त्यावर जरावेळ झाल
व श्री म्हणाले, ते ५।६ इसम मला म्हणाले आम्हीं त्याला पाहून आणूं
मी म्हटलें अरे तिथं जनावर लई मोठं आहे तुम्हाला बी चावेल कशाला
जातां. ऐकलें नाहीं ते तिकडे गेलेल्यानाबी जनावर चावलं. ते समदे मरून
गेले. मग मी त्या समद्यांना कफन दिली आन, चाललों पुढें. इतक्यांत एक
लई धटींगण आवा ( बाई ) आली ती मला म्हणाली तो भाऊ कुठें गेला?
मी तिला म्हटलं जनावर चावलं त्याला कफन बी दिलं. ती म्हणाली मी त्याला
पाहायाला जातें, मी तिला म्हटलें नको. पण ती ऐकेचना, लई आवा दांडगी.
ती मला म्हणाली ५।६ आदमी कुठें गेले ? मी ते बी मरून गेले त्यांना बी
जनावर चावलं असें म्हटलें. मी तिला म्हटलं तूं कशाला जातें तिकडे तुला तो
भाऊ भेटायचा नाहीं. ती म्हणाली मी तर जाईन त्याला शोधून काढीन असें
छातीवर हात ठेवून ती पुढें गेली. पण अल्ला मालकाची करनी तिला बी
जनावर चावलं मी आपलं तिचं बी दफन केलं पुढें चाललों लई लांब गेलो
इतक्यांत खूप बोकड घेऊन ५।७ मुसलमान आले, मला म्हणाले जरा उभा

राहा. मी उभा राहिलों त्यां मुसल्मानानीं ती बोकडं मारण्याचा सपाटा लावला. समंद बोकड चिरले. त्याची सागुती केली आणि माझ्या पुढें आणून म्हणाले खा. मी त्यांना म्हटलं मी तर ब्राह्मण आहें मी खाणार नाहीं ते ऐकेनात माझ्या तोंडांत खुपसायला लागले मग मी म्हटलें जरा थांबा मी देवाचें ध्यान करून खातों.त्यावर कपडा घाला मी देवाची याद केली अन मग काय विचारतां समदीं गुलाबाचीं फुलेंच फुलें झालीं लई मोठी. एका हातात तें एक फूल मावणार नाहीं असं फूल मोठं आपल्या शिर्डीला बी असंच मोठं फूल आपण आणूं बर कां ( म्हाळसापतीला उद्देशून जी म्हणाले ), ते समदे मुसल्मान आल्या रस्त्यानें गेले. मी पुढें चाललों जातां जातां मागें पाहतों तों पांढरें स्वच्छच स्वच्छ पाणी. पुढें मी एक पावलाचे वाटेनें लांब गेलों. पुढं बी पानी मागे बी पानी समदीकडे पानी. एक पावली वाटबी नाहीं अन कांहीं नाहीं, अशी अल्ला मालकाची करनी. आपल्या गरिबांचा वाली अल्ला मालीक आहे बरं. असें म्हणून मला म्हणाले, बरें शाम असच समद असतं आपल्याला काय करायाचें. चांगल चालेल बरं जा आतां वाडयांत. अशाच शिव्या द्याव्या असंच बोलाव आन पोथीबी वाचावी ॥ झालें आम्ही उभयतां उदी घेऊन वाडयापर्यंत आलों. मी वाडयांत गेलों. बाळासाहेब आपल्या बिऱ्हाडीं गेले. दुसरे दिवसीं श्री अत्यंत रागांत. सकाळपासून दुपारीं २-२॥ वाजे पावेतों होते; पण त्यांचा नित्यक्रम म्हणजे भिक्षा लेंडी दुपारची आरती मंडळीचें येणें वगैरे सर्व कांहीं नेहमी प्रमाणें झाला. कैकाना मारही पण बसला सर्व शांत झाल्यावर मी नित्याप्रमाणें दुपारीं ३-३॥। वाजतां गेलों बसलों पाय दाबित. अर्धापाऊण तास झाला असेल. चिलम पीतां पीतां ती चिलम मजपुढें करून घे म्हणतां मी संकोचलों. पुन्हां घे असें म्हटलें जवळ धरली इतक्यांत श्री म्हणाले कायरे '११ रुपये तुझे पावले ना ? मी म्हटलें बाबा पोथीच्या बाबतींतच जर हे ११ रुपये असतील तर मला आतां खूण पटली. पोथी वाचीन पण कोणची पोथी वाचूं. त्यावर श्री म्हणाले तूं आणि मी ज्या

पोथींत बोलतों व बोललों तीच वाचावी. भगवान बोलला तीच तशीच वाचावी. कांहीच समजेना स्वस्थ बसलों विचार पुष्कळ केला पण कांहीं नाहीं मनांत विचार आला. गीता वाचावी म्हणून बाबांना म्हटलें बाबा गीता वाचूं का? त्यावर पुन्हां तींच वाक्यें । तूं आणि मी ज्या पोथींत बोलतों तीच वाच. मग मनांत आलें पूर्ववतच ज्ञानेश्वरी वाचूं झालं. पुन्हां श्री म्हणाले, अरे शाम बापुसाहेब जोगांकडे जाऊन पोथी मागून आण. मग मात्र अर्थ स्पष्ट कळला कीं, श्रीएकनाथी भागवतच मी वाचावें अशीच आज्ञा होय. मी जोगांकडेस गेलों तर ते भागवत वाचनास बसणारच होते. मी म्हटलें बाबांनीं पोथी घेऊन ये असें मला सांगितलें त्यांनीं तो ग्रंथराज हातीं दिला व म्हणाले लौकरच घेऊन या बरें. मी पोथी घेऊन मशिदींत गेलों श्रीचे पुढें उभा राहिलों. श्रींनीं आण पाहूं म्हणून हातांत घेतलें व एकदम उघडून म्हणाले हें काय आहे वाच बरं. मात्र जसं असल तसंच नेहमी वाचावं बरें. आपूनच अर्थ करावा. पण अर्थ काय लोकांना नको जसंतसंच रोज वाचाव बर. तो अध्यायही श्रींनीं कांहीं पाहून किंवा पानें चाळून असा काढून दिला नाहीं तर एकदम उघडलें. ११ वाच अध्याय तो होता. असें म्हणून जा आतां आपलं नांव तसंच त्यांत पाहा रोज वाचा व ज्याची त्यास नेऊन दे. जरा तिथं बैस मग ये बरं. मी पदीं भाल ठेवून जोगांचेकडेस गेलों. त्या दिवशीं मला तरी काय वाटलें तें कांहीं सांगणें अशक्यच. होय. पण श्रीसाईराजांची व्यापकता व त्यांची लीला तेंच जाणोत. आम्हां मानवांना त्याच लीलानिधीचा पार लागणें अशक्यच होय. त्यांचें नामामृत सेवणें व ते ठेवतील त्या त्या स्थितींत आनंदानें राहाणें हेंच योग्य होय; श्रीसाईराजाला उपमा कोणती द्यावी । तुझीच उपमा तुला बरवी शोभते सज्जना, समर्थ गुरु साईनाथ पुरवी मनोवासना ॥ हेंच खरें व मागणें तें हेंच कीं शेवटील मागणें जें मागितलें तेंच पुन्हा येथें नमूद करीत आहें.



पद.

सांभाळावें सकल जगाला ॥
भक्तिप्रेम तें लागो मजला ॥
सर्वांभूतीं तुंची नटला ॥
ऐसें देणें देई । सकलगुणनिधान साई ॥

किंवा

अंत न लागे तव महिमेचा । गाया श्रमली दुवळी वाचा ॥

हेंच खरें. अस्तु. हे साईश प्रभो तुझें साह्य सर्वांस सारखें मिळून ह्या भवजलनिधींतून आम्हां मानवी प्राण्यांचा उद्धार करणाऱ्या साईश्वरा तुला शतशः प्रणाम असो.

---

श्री साई बाबा यांचे एक भक्त रा. रा. गोपाळ दिनकर जोशी हे इ. स. १९१२ सालीं शिर्डी येथें श्री समर्थांचे चरणाजवळ सुमारें एक वर्षभर राहात होते.त्यावेळेस सकाळीं न्यहारी झाल्यावर समर्थ लेंडीकडे जावयाचे वेळीं समर्थांचा फोटो घ्यावा म्हणून बऱ्याच मंडळींचा व त्यांचाही मनोदय होता. त्याप्रमाणें रावबहादुर साठे यांचे वाडयाचे ( हल्लीं हा वाडा रा. रा. रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर बी. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट प्लीडर यांनीं विकत घेतला. आहे ) मागचे बाजूस पटांगणावर समर्थ लेंडीवर जाण्यास निघण्याचे अगोदर कॅमेरा वगैरे तयारी सर्व जयत ठेविली होती. त्याच बाजूनें बाबा लेंडीवर जात व त्या जागीं पुष्कळ मंडळी त्यांचें दर्शन घ्यावयास जमून तयार

राहात. बाबा त्या स्थळीं येतांच त्यांचा फोटो घेऊं देण्याची परवानगी माग ण्यांत आली. बाबा म्हणाले, "आपल्याला फोटो वगैरे कांहीं नको, बाकी लोकांचा घ्या" तरी पण नित्याप्रमाणें मंडळीस दर्शन घेऊं देण्याकरितां बाबा उभे असतां आधींच लाऊन तयार ठेवलेल्या कॅमेऱ्यांतून एक प्ले घेतलीच. परंतु बाबांनीं म्हटल्याप्रमाणेंच प्रकार झाला. त्यांचा सबंध चेहरा न निघतां त्यांचे पायच तेवढे स्पष्ट उमटले. सदहू छाया चित्राचा नमुना सोबत आहेच. त्यांत आश्चर्य हें कीं आजूबाजूस असलेल्या इतर मंडळीचे अवयव त्यांत स्पष्ट उठले आहेत. हा फोटो घेतल्याबरोबर रा. रा. माधवराव देशपांडे बाबांस म्हणाले " बाबा तुमचा फोटो घेतला. त्यावेळेसही पुन्हां बाबा म्हणाले कीं, " आपल्यास फोटो वगैरे कांहीं एक नको, तो आपणास काय करावयाचा आहे ? हा फोटो रा. रा. गोपाळराव यांचे चिरंजीव रा. यशवंतराव यांनीं घेतलेला आहे. त्याला समर्थ भाऊ या नांवानें हांक मारीत. समर्थांची लीला अगाध आहे !

या फोटोचें प्रिंटिंग वाचकाकरितां या अंकांत देण्यांत आलें आहे.

## श्रीउद्धवेशबुवाकृत स्फुट

॥ ॐश्रीगुरुसाईशप्रसन्न ॥

जांभूळपाडा आषाढ शुद्ध ११ एकादशी शके १८४७

### शके १८४७ चातुर्मासारंभाचें पद

( चाल—अजि अक्रूर हा नेतो ).

॥ श्री साइ गुरो वंदन तुझिया पायां ॥ ह्मणि धांवधांवरे सदया ॥ धृ० ॥ तव आज्ञा ही " जंबु[1]ग्रामि " त्वां राहावें । चार हे मास कंठावे । (चाल बदलून) तूं दीन जना सहकारी ॥ होईच साच[2] कैवारी । तुज वांचोनी अन्य नाहीं मज त्राता । विनवीत शाम[3] तव ताता ॥१॥ मजसाठिं तुला श्रम हे नित्यचि होती । कोण हे करिल ती गणती । तत् त्रासानें लोटुं नको या बाला । चरणासी ध्यात हा आला । ( चाल बदलून ) प्रार्थना तुझीयाचरणींरे । जे साचशरणही तुजसींरे । त्यां तारि प्रभो भवजलधी पासोनी । अन्यही विनति आज नाहीं ॥ २ ॥ श्री साई गुरो० ॥

पद—( वंदन साईपदाला; किंवा साध्यनसे मुनि कन्या या चालीवर. )

चैत्र शु॥ ५ शके १८४८ शनिवार.

भावें नमितों साईपदाला ॥ सुदिन तो आजि भला ॥ चैत्र शुद्ध ती रामनवमी ही ॥ अपार मांदी भक्तांची ही ॥धृ०॥ नाम सुधारस होती तृप्तही ॥ वासंतिक ऋतु आला ॥ जन हे जाती शीलधी[4]-पुराला ॥ सुदिन तो ॥ १ ॥ भेद न हिंदूयवनाचाही । नरनारी बहु उत्सुकतेही । जाती प्रभूच्या स्थानालाही । हर्षची वाटे मनाला ॥ तोचि सोहळा पूर्णतेला । सुदिन तो ॥ २ ॥ दास

---

१ परशुराम क्षेत्रांत सह्याद्रीचे खोऱ्यांत जांभूळपाडा २ साह्य करणार ३ उद्धवेश. ४ शिर्डी

गण्ची रसाळवाणी। कीर्तनींतीही प्रभुत्व आणी । प्रतिवर्षां हो नेमें येउनी । सांगकरी यात्रेला। थोरचि ठेवा त्यांसीं दिधला। सुदिन तो ॥ ३ ॥ राम–रहिम तो एकचि आहे । साई, बाबा नामचिपाहे । दोहीं नामीं एकचि राहे । ऐसी ही अघटित लीला। शामासी देई भक्तिरसाळा । सुदिन तो आजी भला । भावें नमितो साईपदाला ॥ ४ ॥

१२६ रास्तेपेठ पुणे शहर ता० १८ एप्रिल १९२६

श्री प्रि. बं.

दाभोळकर यांस सा. न. वि. वि. खालील पदास साईलीलेंत जागा मिळेल अशी आशा आहे क. लो. अ. हे वि. न. भ. ता. तर्खड

( मोरे सैया पडुरे तोरे पैयां या चालीवर )

येथें ऐसा कां श्री नाथा मनमोहन साईनाथा ॥ येथें ऐसा कांहो नाथा ॥ धृ० ॥ कायकेलें अयोध्यानगर ॥ येथें वसविलें शिर्डी क्षेत्र ॥ श्री नाथा ॥ १ ॥ ऐसा ॥ काय केळी शरयू गंगा । येथें गोदा महाभागा । पतितपावना ॥ २ ॥ काय केळीं जनक कुमरी। येथें बनलां ब्रह्मचारी । जगच्चालका ॥ ३॥ काय केलें वानरदळ। येथें मेळविले भक्तपाळ । भक्तपालका ॥ ४ ॥ काय केला हनुमंत। येथें नाना, काका भक्त । पुंडलीकवरदा ॥ ५ ॥ काय केला रत्न-मुगुट। येथें वस्त्र शिरीं फाटक । दीनवत्सला ॥ ६ ॥ काय केला पीतांबर । येथें कफनी सुंदर। अवधूता ॥ ७॥ काय केलें धनुष्यबाण । येथें हातीं दंड घेऊन । दंडधारका ॥ ८॥ कोठें बुक्का तुळसीहार ॥ येथें उदीचा संसार ॥ रोग हारका ॥ ९ ॥

म्हणे ' इंदिरा ' जैसाभाव ॥ तसा झाला सद्गुरुराव ॥

श्रीमन्नारायणा ॥ श्रीमन् नारायणा ॥ श्रीमन् नारायणा ॥

सद्गुरुपदारविंद लीन

बारे साइनाथा कधीं भेट देसी । होतो कासाविशी जीव माझा ॥१॥
रूप जें विनाशी तेंहि चोरियेलें । कां हो मज केलें दीनवाणें ॥ २ ।
तव देहद्वारें अविनाशी रूप । पहाया हुरूप होता मनीं ॥ ३ ॥
परि दुर्भाग्यें मीं मुकलों त्या ठाया । आतां देवराया काय करूं
॥ ४ ॥ आपुलें वचन पाळूनियां नाथा । तारी ह्या अनाथा
साक्षात्कारें ॥ ५ ॥ त्यावीण ह्या दीना कधीं नोहे शांति । काय
विश्वपति नेणसी तूं ॥ ६ ॥ नको अंत माझा पाहूं दीननाथा ।
तुझ्या अंकीं माथा अर्पीलासे ॥ ७ ॥ तारी किंवा मारी लेकरूं
अपुलें । शरण जें आलें तुज लागीं ॥ ८ ॥ शाब्दिक ज्ञानाचा ।
आला असे वीट । होसी ना प्रकट कां मच्चित्तीं ॥ ९ ॥ तुझ्या
भक्ता ऐशी मनीं तळमळ । ह्याचें नांव छळ कैसें नाहीं ॥ १० ॥
जन्ममृत्यूचें तें भय नाहीं मज । माझें सर्व काज साक्षात्कारीं
॥ ११ ॥ तो होईपर्यंत । असे अंश तूझा । त्याच्या पुढें माझा ।
तूं सर्वस्वीं ॥ १२ ॥ ऐसें झाल्यावरी नासे मी तूं—भाव । पुढें
मज ठाव तवरूपीं ॥ १३ ॥ सद्गुरु माउली रक्ष रक्ष मज । दास
वदे तूज नीलकंठ ॥ १४ ॥

## श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न.

## श्री शिर्डीसंस्थानचा वार्षिक चौथा म्हणजे शके १८४७ चा रिपोर्ट.

१ या वर्षांत श्री शिर्डीसंस्थानकमिटीच्या सहा सभा भरल्या त्यांत ज्या महत्वाच्या बाबी निघाल्या त्यांचा गोषवारा खालीं दिला आहे.

२ जुन्या कमिटीची मुदत संपून नवी कमिटी निवडण्यांत आली असल्याकारणानें त्यांतून अध्यक्ष, खजिनदार व चिटणीस यांच्या निवडणुकी कराव्या लागल्या व त्याजागीं अनुक्रमें ह. भ. प. दासगणू महाराज, रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोळकर व रा. रा. हरि सीताराम दीक्षित यांच्या नेमणुकी झाल्या. संस्थानचे नियमाप्रमाणें चिटणीस व खजिनदार यांनीं रा. रा. रामचंद्र दादा पाटील व रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे यांची जोडचिटणीस व जोडखजिनदार म्हणून नेमणूका केल्या.

३ श्री संस्थानचे मुख्य चार उत्सवासंबंधानें आरंभीं असें ठरविण्यांत आलें होतें कीं ते मुख्य दिवसाच्या दोन दिवस आगाऊ सुरु व्हावे व मुख्य दिवसानंतर दोन दिवसांनी संपावे. ही व्यवस्था अनुभवांतीं सोईची न वाटल्यामुळें कमिटीनें ता. २६-४-२५ चे सभेमध्यें असें ठरविलें कीं, उत्सव फक्त एक दिवस अगोदर सुरु होऊन मुख्य दिवसाचे पुढें तीन दिवस चालू रहावा.

४ महाराजांचे जुने शेले जे फाटले आहेत त्याबद्दल उल्लेख मागील रिपोर्टांत केला आहेच. त्यांत म्हटल्याप्रमाणें या बाबतीचा पुन्हां विचार होऊन असें ठरविण्यांत आलें कीं शंभर रुपये देणाऱ्या कोणत्याही भक्तास एक एक जुना शेला प्रसाद म्हणून द्यावा. असे जुने शेले सध्यां २ शिल्लक आहेत. कोणाची मागणी आल्यास कमिटीच्या वरील ठरावाप्रमाणें ते देण्यांत येतील.

५ कै. दामोदर घनःशाम बाबरेकर उर्फ अण्णा चिंचणकर यांनीं आपल्या इस्टेटीचा विनियोग महाराजांचे प्रीत्यर्थच करण्यासाठीं मृत्युपत्र क

ठेविलें होतें. याविषयींचा मजकूर शके १८४४ च्या रिपोर्टांत आलाच आहे. त्या इस्टेटीवर कर्जापोटीं हातेबंदीचा हुकूमनामा झाला असल्यामुळें त्या हप्त्यांची फेड करण्यासाठीं दीडशें रुपये संस्थानांतून देण्याचें कमिटीनें ठरविलें. अर्थात अशा रकमा उत्पन्नांतून परत घेतल्या जातीलच.

६ महाराजांचे लेंडीची जमीन रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं रा. रा. तात्या पाटील यांचे नांवें घेतली होती. ती संस्थानास त्यांनीं बक्षीस देण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें कायदेशीर बक्षिसपत्र होऊन तें नोंदण्यांत आलें. त्याबद्दल झालेला खर्च रु.१०-२-० चालू सालचे आढाव्यांत श्रीसंस्थान स्थावर मिळकत खात्यांत नांवें लिहीला आहे.

७ कमिटीनें गतवर्षीं ठरविल्याप्रमाणें लेंडीवर आमराई लाविली आहे; पण त्यापैकीं कांहीं झाडें गुरांनीं खाल्यामुळें फिरून लावावीं लागतील. तीं लावण्यासाठीं व तारेचें कंपाउंड करण्यासाठीं कमिटीनें शंभर रुपयांची मंजूरी दिली आहे. हें काम आतां लवकरच हातीं घेण्यांत येईल. तसेंच बागेच्या राखणीसाठीं महिना दहा रुपयेपर्यंत खर्च कमिटीनें मंजूर केला आहे.

८ संस्थानचे कामासाठीं एक कारकून नेमावा असें ता० ५-७-२५ चे सभेंत ठरविलें होतें व त्याप्रमाणें रा. दाजी वामन चिंतांबर यांची नेमणूक करण्यांत आली होती. कांहीं महिने अनुभव घेऊन कमिटीनें असें ठरविलें कीं स्वतंत्र कारकुनाची आवश्यकता नाहीं व म्हणूनच रा. चिंतांबर यांस कमी केलें. ते करीत असलेलें सर्व काम रा. दाळा गुरव यांनीं करावें व त्याचा पगार महिना पांच रुपये वाढवून द्यावा असें कमिटीनें ठरविलें.

९ ललितकलादर्शक नाटक मंडळीचे मालक रा. रा. व्ही. बी. पेंढारकर यांनीं आपल्या एका खेळाचें उत्पन्न संस्थानचे कायम फंडास देण्याचें ठरवून त्याप्रमाणें ता. २५ नोवेंबर १९२६ रोजींच्या "राक्षसीमहत्वाकांक्षा" या खेळाचें उत्पन्न दिलें. त्यामुळें संस्थानला एकंदर रु. १८२८-१० मिळाले.

याबद्दल त्यांचे व ही योजना जुळवून आणल्याबद्दल रा. रा. बाळकृष्ण विश्वनाथ देव यांचे आभार कमिटीनें मानले आहेत व रा. रा. पेंढारकर यांचे नांव आश्रयदात्यांचे यादींत घातलें आहे.

१० महाराजांची एक सुंदर तसबीर रा. रा. शामराव रामचंद्र जयकर यांनीं स्वतःसाठीं कांहीं मोबदला न घेतां तयार करून संस्थानला दिली व ती महाराजांचे चावडींत ठेविली आहे. त्या तसबिरींत महाराजांबरोबर त्यांची बरीच भक्तमंडळीही आहे. रा. जयकरांच्या या देणगीबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे.

११ नेहमीच्या वहिवाटी प्रमाणें यंदाच्या जमाखर्चाचा आढावा संस्थानचे ऑडीटर रा.रा. जिवाजी कृष्ण परूळकर यांनीं तपासून पास केला आहे. तो सोबत परिशिष्ट " अ " म्हणून जोडलेला आहे. रा. परूळकर कांहीं मोबदला न घेतां संस्थानचे हिशेब तपासून देतात याबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे.

१२ शके १८४७ चें बजेट परिशिष्ट " ब " म्हणून जोडलें आहे. त्यांतील आकडयांची वरील आढाव्यांतील आंकडयांशीं तुलना करतां असें आढळून येईल कीं सर्व रकमा बजेटच्या पेक्षां कमीच आहेत. मात्र संस्थान भांडी व श्रीसंस्थान स्थावर मिळकत या रकमा नवीन आहेत. संस्थानासाठीं कांहीं लहान भांडीं अवश्य पाहिजेत असें गेल्या पुण्यतिथीचे उत्सवाचे वेळीं दिसून आल्यामुळें भांडीं घेण्याची मंजुरी कमिटीनें दिली व त्याप्रमाणें कांहीं भांडीं घेण्यांत आलीं. त्यानंतर रा. रा. सुरेंद्र आत्माराम तर्खड यांनीं बरींच लहान मोठीं भांडीं अदमासें रु. किंमतीचीं संस्थानाला बक्षिस दिलीं व त्याबद्दल संस्थान त्यांचे आभारी आहे.

१३ श्रीसंस्थानस्थावर मिळकत खात्यांत खर्चीं पडलेल्या रकमेचा खुलासा वर कलम ६ मध्यें आलाच आहे.

१४ महाराजांचें चवरी व मोर्चेल फिरून नवें करण्याची आवश्यकता वाटल्यावरून चवऱ्या नव्या करविल्या आहेत. व मोर्चेल करावयास दिला आहेत.

१५ आढाव्यावरून असें दिसून येईल कीं यंदा कायम फंडांत रु. ५९४०॥=। जमा झाले; पण यापैकीं रा.रा. पेंढारकरांचे नाटकाचें उत्पन्न १८२८--१० व श्री पुण्यतिथी खात्यांतून रु. ८०० श्री गुरु पौर्णिमाखात्यांतून रु. ४०० व श्री कोठी खात्यांतून रु. ३०० कायम फंडांत वर्ग झाले. ते बाद केले तर यंदाचें कायम फंडाचें उत्पन्न फक्त रु. २६११--९--३ राहील. वार्षिक उत्पन्नाचें व कायम फंडाचें मान दर वर्षी उतरत्या प्रमाणावर आहे. इकडे महाराजांचे भक्तांचें लक्ष जाऊन ते दोन्ही बाबतींत शक्य तो प्रयत्न करून ही स्थिति सुधारतील अशी आशा आहे. प्रयत्नाला यश देणार महाराज समर्थ आहेत.

१६ शेवटीं सालाबाद प्रमाणें—

देवा साईनाथा त्वत्पदनत भावें ॥
परमाया मोहित जनमोचन झणि व्हावें ॥
त्वत्कृपये सकलांचे संकट निरसावें ॥
देशिल तरी दे त्वद्यश दासानें गावें ॥

अशी महाराजांची प्रार्थना करून हा रिपोर्ट संपवितों. शिर्डी शके १८४८ आषाढ शु ॥ १५ ता. २५ जुलै १९२६ अध्यक्ष

दासगणु

रामचंद्र दादा पाटील कोते

दुय्यम चिटणीस

परिशि

श्री साईनाथ

श्री शिर्डी संस्थानचे शके १८४७ चे

| जमा | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| श्री शिल्लक शके १८४६ अखेर | २५९२ | ११ | ० |
| श्री मासिक वर्गणी खाते जमा | ७०७ | १५ | ३ |
| श्री वार्षिक वर्गणी खाते ,, | ५७३ | १४ | ० |
| श्री सगुणोपासना पुस्तक विक्री ,, | ६६ | ४ | ० |
| श्री व्याज खाते ,, | ५५९ | ६ | ० |
| श्री तसल मात खाते ,, | १५ | ८ | ० |
| रा. रामचंद्र आत्माराम तर्खड खाते | ७ | ४ | ० |
| रा. शामराव रामचंद्र जयकर | ८ | ० | ० |
| धी इंपिरियल बँक खाते ,, | ६१४२ | १४ | ० |
| कै. दामोदर घनःशाम बाबरेकर इस्टेटखाते | ४ | १५ | ६ |
| श्री कोठी खाते ,, | ४८ | २ | ० |
| श्री पेटी ,, | ८६३ | ८ | ३ |
| श्री कायम फंड ,, | ५९४० | ३ | ३ |
| श्री दक्षणा खाते ,, | १८ | ० | ० |
| श्री भक्तांचे धर्मकृत्य खाते ,, | ११९ | ११ | ० |
| एकूण | १७६६८ | ४ | ३ |

मी वरील जमाखर्चाचा आढावा हिशेबावरून तपासला तो बरोबर आहे.

कायम फंडाच्या सिक्युरिटीज (सरकारी रोखे) व शेअर्स मी पाहिले आहेत.

Bombay 16 th July 1926.

J. K. Parulkar.
Certified Auditor.

* व सिक्युरिटिज आहेत त्याः—

| | | |
|---|---|---|
| ६ टक्के वॉरलोन १९२७ | रु. | ६५०० |
| ३॥ टक्के सरकारी नोटा | रु. | २०० |
| ६ टक्के न्यु म्युनिसिपल लोन | | ३००० |
| पोस्टल कॅश सर्टिफिकेट | | ९००० |
| धी मराठा प्रॉव्हिडंट फंडाचे शेअर्स २ प्रत्येकी रु. ५० | | १०० |
| | रु. | १८८०० |

शिवाय एक ६ टक्के १९२७ चा १०० रु. १००
वॉरबाँड पुण्यतिथी खात्याचा आहे.

दासगणु
रामचंद्र दादा पाटील कोते
जो. आर्. दाभोळकर

अध्यक्ष
दुय्यम चिटणीस
खजिनदार

(अ)

प्रसन्न

जमा खर्चाचा आढावा

| खर्च | | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| श्री तसलमात खाते | नावे | १४२ | १० | ० |
| श्री धुनी सर्पण | ,, | ६२ | १४ | ० |
| श्री नंदादीप | ,, | १६५ | ६ | ० |
| श्री इंपिरियल बँक | ,, | ५७९३ | ० | ० |
| श्री संस्थान स्थावर मिळकत खातें | | १० | २ | ० |
| ,, ,, भांडी | ,, | १३४ | ८ | ६ |
| श्री कायम फंड लोन खातें | ,, | ६८९२ | १३ | ० |
| कै. दामोदर घन:शाम बाबरेकर इस्टेट | | १५० | ० | ० |
| श्री कोठी खातें | ,, | ३०० | ० | ० |
| श्री पूजा खर्च | ,, | १०३ | ३ | ६ |
| श्री घोडा | ,, | ९७ | १५ | ३ |
| श्री रोषनाई | ,, | २८९ | २ | ० |
| श्री पगार | ,, | ७६३ | ० | ९ |
| श्री आमराई | ,, | ६७ | २ | ० |
| श्री दक्षणा खातें | ,, | ३५५ | ० | ० |
| श्री नैवेद्य | ,, | १५६ | ० | ० |
| श्री शिर्डी किरकोळ खर्च | ,, | ७८ | ९ | ० |
| श्री मुंबई आफिस खर्च | ,, | १६४ | १४ | ३ |
| श्री भक्तांचें धर्म कृत्य | ,, | ११४ | ९ | ६ |
| श्री सादिलवार खर्च | ,, | ५७ | ८ | ९ |
| श्री संस्थान सामान दुरुस्ती खातें | ,, | ८८ | ८ | ० |
| एकूण | | १५९८६ | १४ | ६ |
| श्री शिलक वर्ष अखेर | | * १६८१ | ५ | ९ |
| | | १७६६८ | ४ | ३ |

* या शिवाय धी ईंपिरियल बँक ऑफ इंडियाकडे सेव्हिंग बँकेंत शिलक आहे ती रु. १०९५-९-६

(* पुढील जमा पृ० ३७२ पाहा).

## परिशिष्ट ( ब )

### शके १८४७ चे खर्चाचें अंदाजपत्रक.

| | | | |
|---|---|---|---|
| पूजाखर्च रुपये | २०० | १००० | पगार खर्च |
| नैवेद्य | २५० | ४०० | दक्षणा |
| रोषनाई | ३५० | १५० | शिर्डी किरकोळ |
| घोडा | २०० | २०० | मुंबई ऑफिस |
| नंदादीप | २०० | १८० | सादिलवार, |
| धुणी सर्पण | १०० | २०० | किरकोळ दुरुस्ती |
| | १३०० | २१३० | |
| | | १३०० | |
| | | ३४३० | |

G. R. Dabhollohr.  
खजीनदार.

दासगणू.  
अध्यक्ष

रामचंद्र दादा पाटील कोते.  
दुय्यम चिटणीस.

## श्रीसाईनाथ प्रसन्न.

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चूडामणी कृपानिधि साई महाराज संस्थान मौजे शिर्डी तालुके कोपरगांव जि. अहमदनगर यांच्या श्रीरामनवमीच्या वार्षिक उत्सवाचा अहवाल व जमा खर्चाचा तपशील.

**जमा**

| | |
|---|---|
| १५१ | रघुनाथ नरहर वचुवार मु. खेड |
| *१८३॥≈॥ | गोविंद रघुनाथ दाभोळकर |
| १। | गणेश दिनकर वैद्य |
| ६ | डब्ल्यु. ए. डोंगरे |
| १। | गोविंद प्रल्हाद घोणे |
| १ | सौ० सीताबाई राजाराम वालावलकर |
| २ | गोविंद रघुनाथ दाभोळकर |
| २१ | सौ० लक्ष्मीबाई नारायण गोरक्षकर |
| १ | रामराव दीनानाथ मदन |
| १॥≈। | नारायण गोविंद काजळे |
| १० | दाजी विठ्ठल सांबारे |
| २ | यशवंत जनार्दन गाळवणकर |
| २ | राजाराम केशव वालावलकर |
| १० | जी. डी. जोशी |
| १० | गोविंद नारायण दाभोळकर |
| १। | रामचंद्र भिकाजी जोशी |
| ४ | आनंदराव पर्शराम डोळस |
| २ | वामनराव माण गोविंद पटेल |
| २ | चिंतामण रघुनाथ सातघरे |

**नावें**

| | |
|---|---|
| १८५ | रामचंद्र आनंदराम मारवाडी यास रामनवमीच्या सामानाबद्दल |
| १३८ | मल्हारमल तुकाराम मारवाडी यांस तांदळाबद्दल |
| ४। | रुपचंद बाळचंद मारवाडी उपरणें जोडी २ बद्दल |
| ६८ | गोविंद काशिनाथ करवेल्कर राहाणार पुणे आच्यारी यास<br>३० स्वयंपाकाबद्दल<br>१५ जरीचें उपरणें १<br>१५ रेल्वे भाडें<br>६ दीनकर आच्यारी यास उपरणें पान १<br>२ गाडी भाडें<br>—<br>६८ |
| १८ | महमद सैदूभाई राहतेकर यास वाजाबद्दल |

---

* या रकमेच्या पोटरकमांची बेरीज रु. १८६≈॥- येते, परंतु सुंठवडा पाठविण्याच प्रसादाच्या पिशव्या तयार करणें व पोष्टेज वगैरे आलेला खर्च रु. २।≈॥ वजा करून बाकीची रकम १८३॥≈॥ मुंबई ऑफिस मार्फत दासगणु यांस दिली होती तेवढीच त्यांनी जमा धरलेली आहे.

नांवे

५ आनंदराव सुंदरजी धुरंधर
१ बाळकृष्ण वामन वैद्य
५ आर्. बी. जुन्नरकर
२ जी. एम्. चौबळ
५ जगन्नाथ रामजी तांडेल
२ गजानन महादेव वायंगणकर
५ रामचंद्र रामकृष्ण सामंत
१० डॉ० रंगनाथ नारायण गव्हाणकर
१ सौ० यमुनाबाई रंगनाथ गव्हाणकर
२॥ रघुनंदन रंगनाथ गव्हाणकर
५ गोविंद नारायण सामंत
१ आत्माराम बाबाजी पेंडूरकर
३॥। सांवळाराम आत्माराम शिरोडकर
१। सौ० राधाबाई सावळाराम शिरोडकर
५ त्रिंबक आनंदराव कर्णीक
२ द्वारकानाथ मुकुंद दुर्वे
१ शंकर अनंत प्रधान
१ गोविंद लक्ष्मण फणसे
२ पुरुषोत्तम गोपाळजी घडीयाळी
५ श्रीकृष्ण विनायक दीक्षित
२ वाय्. आर्. जुन्नरकर
५ सौ० लीलावतीबाई के० चोणकर
२। महादेव गंगाधर कोरान्ने
१० राजेबहादुर जगन्नाथराव गोपाळराव
२ देऊ हरशेट कालण

१२१ शेक महंमद अबदुल मिया अकोळकर दारुवाला या...
• १०० शोभेच्या दारुबद्द...
१३ गाडीभाडें
७ इनाम
१ मुलास बक्षीस

१३१

१ महमद सैदु ताशेवाला
१४॥=। ब्राह्मण दक्षणा पंगतीची दिले...
२२।≡ अभिषेकाची दक्षणा
१ परातीचे कल्हईबद्दल
१५।=॥ केशर, हिंग, चहा, मिर... पोस्तेबदाम. हस्तें लक्ष्मी... बाई जोगळेकर
११॥≡ भाजीपाला शिर्डीचे बाजा... मधील बटाटे, भोपळे वगै...
२९। बाबा धर्माधिकारी यांसी दिले त्याचा तपशील
१० रामायण वाचण्या... बद्दलदक्षणा
१५ जरतारी उपरणें पान १
४। रेल्वे व बैलगाडी भा...

२९।

खर्च

४ आंधळेपांगळे यांना दिले
१॥ खुशालचंद रुपचंद पत्राव... बद्दल द्वादशीस कमी पडले... घेतल्या.

जमा

५ विनायक आप्पाजी वैद्य
१ बळवंत आप्पाजी वैद्य
१। चिंतामण महादेव चौबळ
१। हरीभाऊ विनायक चौबळ
१। अनंत बापूजी प्रधान
१। शंकर बाळकृष्ण वैद्य
५ श्री० जनाबाई सिताराम घटे
५ वेदशास्त्रसंपन्न श्रीपाद रामचंद्र तिरसीकर

——

१८३॥=॥.

२८८=॥ लक्ष्मीबाई जोगळेकर
३५ श्रीमंत सरकार नारायणराव बुळे इंदूर
२५ श्रीमंत भवानराव बनसुडे इंदूर
२५ बाळासाहेब रेगे वकील खांडवा
१६ हरलाल माणकलाल डहाणू
१५ माधवराव दादोबा महंत मुंबई
१५ नारायण जनार्दन तेंडुलकर
१२ द्वारकाप्रसाद रामलाल पराणकर सोलापुर
१० नारायण सदाशिव बडनगरकर
१० गणेश पांडुरंग बेंदरे अंधेरी
१० हरिचंद्र रामजी मिस्त्री अंधेरी
१० जीवनराम बाळकृष्ण बापु भैय्या कोठारी इंदूर
५ पार्वतीबाई शामराव कोठारी इंदूर
५ घोंडोपंत डॉक्टर मुंबई

खर्च

५ श्रीसाई महाराज यांचे नैवेद्याबरोबर दररोज १ रुपयाप्रमाणें ५ दिवसांचे.
५ प्रसादाचे नारळ.
८२८=। तूप डबे ३ त्यापेकी १ डबा रुपये ३३ बाळा शिंपी यांनीं दास महाराज यांचे घेण्यांत दिला, व २ डबे तूप उमरीहून आलें.
२८८=॥ तांदळाचें पोतें हस्तें लक्ष्मीबाई जोगळेकर पुणें.
७॥≈ पत्रावळी — उमरीकडून आल्या हस्तें नारायण बंजारी चौदाशें पत्रावळी.
११ काशिनाथशास्त्री पंढरपूरकर यांस
५ दक्षणा पुराणाबद्दल
$\frac{६}{११}$ उपरण्याचें पान १
८॥ बाळागुरव उपरणें पान १
६ बाळा काशीराम शिंपी उपरणें १
६ गण्या चोपदार उपरणें पान १
५ नाना पुजारी उपरणें पान १
५ लक्ष्मण भट्ट उपरणें पान १
४ मार्तंड भगत उपरणें पान १
३ महादु फसल्या उपरणें पान १
१०॥ पालखी उचलणारे इसम, अप्पा यादव बयाजी रामा
१॥ शिंगाड्या उपरणें १
४ ताशेवाला शिर्डीचा उपरणें १
१॥ अहेल्या मादुकल्या उपरणें १

**जमा**

५ रामचंद्र सितारामदेव अंधेरी
५ वामनराव औरंगाबादकर
५ राजबहादरीणबाई मालेगांवकर
५ पिरुबाई रामराव कोठारी
८ काकासाहेब महाजनी मार्फत
२ पिरोजीबाई विजयोकर
१ रामचंद्र गंगाधर महाजनी
१० एका भक्ताकडून
१। लक्ष्मण महादेव प्रधान शाहापूर
१। भागीरथीबाई अनंत सखाराम जाधव अंधेरी
-॥- राजाराम गणोजी शाहापूर
२ संतुबाई अंधेरी
५ भगवानराव गंगा खेडकर नांदेड
११ गोविंद व्यंकटी महाजनी मुखेड
२६ बाबा रामचंद्र पत्तेवार मुखेड
५ शंकरराव संग्रामा अतनुर
२५ अण्णासाहेब देशमुख बोऱ्हाळकर इंगोली
५ गणेश केशव रेगे अमिसाहेब
७ यशवंतराव पाटील जामगांवकर
५ दत्तात्रय राजाराम पांडे माजरम
११ चनैया मुकावार मुखेड
१५ धोंडोपंत वकील नांदेड
५ चंद्रभागाबाई भ्रतार दामोदर पांडे मांजरम
६ बाबुराव नाना गुळाचो ढेप१
६ वामन गोंदकर गुळाची ढेप१

**खर्च**

२६॥। लक्ष्मण गुरव तवलजी कलमनुरी यांस दिले त्याचा तपशील
१० रोख
८॥ उपरणें पान १
८। गाडी रेल्वे भाडें
२६॥।

५ अल्लाउद्दीन खतीबसाहेब काजीकलमनुरी
१० किसनराव आबाजी कासार पाथरी यास जाण्यायेण्याचे भाड्याबद्दल
-॥।≈ सगुण मिरु नाईक ग्लासबत्या व आगपेट्यांबद्दल
३॥। गीताबाई, गमाबाई, ठकुबाई, राईबाई सरुबाई, मोलकरिणी
१ आनाजी कुंभार रांजण मडकेबद्दल
१ मथु न्हावी दिवे लावण्याबद्दल
१ गोपाळा रंभाजी गोंदकर
-।- पुंजा कोळी भांडी घासण्याबद्दल
१ मल्हारी परीट पाणी तापविणें बद्दल
२॥ महादू परीट धोतरें धुण्याबद्दल
१ रोख
१॥ साधें उपरणें
२॥
२ बजंभट पुण तांबेकर व नानूभट याचा मामा असे प्रत्येकास रु० १ प्रॉ.

| जमा | |
|---|---|
| ६ | बापूराव पुणेकर गुळाची ढेप१ |
| २८ | नागोबा वंजारी तुपाचा डबा१ |
| १४ | व्यंकोबा रंगारी तुपाचा डबा अर्धा |
| १४ | बाबा रंगारी तुपाचा डबा अर्धा |
| ९ | नारायण वंजारी पत्रावळी व तिखट |
| २५ | रंगनाथराव दादासाहेब वरुडकर वकील कलमनुरी |
| ११ | नागोराव गोविंद उंचेगांवकर |
| ११ | राजेश्वरराव गांजापूरकर |
| ५ | भगवानराव मांजरमकर पांडे |
| २ | भाऊराव नौदीकर देशपांडे |
| ८५४८ | |
| ७४।≈।।। * | कमी पडलेले |
| ९२८।ऽ।। | |

खर्च

| | |
|---|---|
| १ | तुकाराम गुरव नकले |
| ८ऽ।। | लक्ष्मी मारवाडी हनुमान जयंतीचे सामानाबद्दल ८ऽ।।- |
| २४।-।। | मुलतानचंद— मारवाडी हनुमान जयंतीचे सामानाबद्दल. |

नांवें

| | |
|---|---|
| ५।।≈ | अनाथ विद्यार्थी यांस विद्यार्जनाप्रित्यर्थ दिले.हस्ते दाजी वामन चिदंबर पावतीवर हुकूम |
| १६।।≈ | कनीराम आनंदराम मारवाडी हनुमानजयंतीचे सामानाबद्दल |
| २९।-।। | श्रीसाईबाबांकडील ५ दिवसांत झालेला खर्च हस्तें रामचंद्र पाटील कोते. |
| ३७।।≈ | हनुमानजयंतीचे महार-मांग, चांभार, वडारी,भिल्ल वगैरेना बेसनाच्या लाडवाचें भोजन दिलें. गुळाच्या भेल्या २ हस्तें बाबुराव सखाराम |
| ३।। | गोरगरीबांस कपडे केले त्याबद्दल दाम. हस्तें बाळा काशीराम |
| १।। | दाजी शेलका, रामा न्हावी गबा सुतार भाजीबद्दल |
| ८।। | चुकारी गाड्याबद्दल दिले. रामचंद्र पाटलानें आणल्या त्या |

* कमी पडलेले दासगणू व मोंगलाईतील मंडळीं यांनीं दिले.

नांवे

२॥≈ रेल्वेभाडें तांदळाच्या पोत्या-
चे हस्तें रामचंद्र पाटील.

१० अबदुल भाई मुजावर
कफनीबद्दल

२९॥≈ फराळाचे लाडू पांच दिव-
सांचे हस्तें दादासाहेब
वरूडकर

२६॥≈। पांच दिवसांचे व चहाचे
एकंदर दूध

३ चहाचे डबे त्याबद्दल हस्तें
लक्ष्मीबाई जोगळेकर

७ चिवडा पांच दिवसांचा

९॥ संत्रीं व मोसंबी पांच दिव-
सांची

१ टरबुजें भाजीकरितां घेतली

१ लालभुजकड बुवा उर्फ लक्ष्-
कनदास उजवेशंखवाला
यांस तात्या पाटील यांचे
सांगण्यावरून दिला.

३॥≈ किरकोळ खर्च

५ उद्‌बत्तीचा पुडा १ हस्तें
भवानीशंकर गणपत
ससीतळ

-॥≈ शिंप्याची शिलाई.

८ गोरगरीबास वाटण्याकरितां

१० सरपण घेतलें त्याबद्दल हस्तें
विठोबा सुतार

५॥-' एकादशीस फराळाचे सामान
बद्दल

१९॥ तांदुळ पायली तेरा हस्तें
गोविंद रघुनाथ दाभोलकर

नांवें

१ गोपाळा रंभाजी गोंदकर यास नवलकर यांचे बखळजागेच्या दुरुस्तीची मजुरी

१ बाळक भाऊ भाऊ तांबोळी उत्सवाचे विड्याचे पानाबद्दल

१०२८।≈।॥ एकूण दहाशें अठ्ठावीस रुपये सात आणे नऊ पै

येणेंप्रमाणें तपशील चरणीं सादर केला आहे. त्यांत चूकभूल असेल त्याची माफी असावी. या रामनवमीचे उत्सवास मोंगलाईंतुन मजबरोबर भगवानराव मांजरमकर. त्रिंबकमहाराज अंदारकर, किसनराव बाबाजी कासार पाथरीकर, विठ्ठलराव रामदुर्गकर, तुकाराम केशवगुरु आजेगांवकर, दत्तोपंत कस्तुर कामनुरीकर, गोविंद पाथरीकर, दत्तोपंत मांजरमकर, अशी मंडळी आली. मागाहून गोविंद व्यंकटी महाजन, भाऊराव नावंदीकर, भगवानराव गंगाखेडकर, दिगंबरराव नांदेडकर, रंगनाथराव दादासाहेब वरुडकर, नागोराव उंचेगावकर, राजेश्वरराव गांजापुरकर, दादा सबनीस, लक्ष्मणराव गुरव कलमनुरीकर. नागोबा वंजारी, नारायण वंजारी, व्यंकोबा रंगारी, सखाराम कुलकुडगी अशी मंडळी बायकापोरांसहीत उत्सवास आली व अण्णासाहेब बोऱ्हाळकर, राजासाहेब माझोडकर यांना जरुरीचे कामामुळें येतां आलें नाहीं. पापालाल मुलीचें लग्न असल्यामुळें येऊं शकला नाहीं. चनैया मुकावार हा गांवाबाहेर असल्यामुळें आला नाहीं. बाबापत्तेवारनें आपला मुलगा दिगंबर रामचंद्र पत्तेवार यांस पाठविलें होतें. शिवाय अल्लाउद्दीनसाहेब काजी कलमनुरी हेही आले होते. पुण्याहून वहिनीबाई जोगळेकर, अंधेरीहून वैंडर, मास्तर, मिस्त्री, मुंबईहून नारायण जनार्दन तेंडूलकर, धोंडोपंत डॅाक्टर, खांडव्याहून बाळासाहेब रेगे व इंदूरहून भवानराव बनसुडे, वडनगरहून नानासाहेब इनामदार, पंढरपुराहून कृष्णाजीपंत गोगटे, काशीकरशास्त्री पुण्याहून मामा-

साहेब, नगराहून बाबा धर्माधिकारी व मुंबईच्या मंडळी पैकीं, काकासाहेब दीक्षित, काकासाहेब महाजनी, रावसाहेब दाभोळकर, सामंत, पुरंदरे व आणखी कांहीं मंडळी आली होती. उत्सवास पुणतांबे संगमनेर, कोऱ्हाळें, कोपरगांव, वगैरे ठिकाणची भटजी मंडळी आली होती. बेलापुराहून बापुराव पुणेकर आपल्या सर्व बायका मुलांसहीत व मित्र–सोयऱ्याधायऱ्यांसहीत आले होते. तरी या सर्व मंडळीवर आपली कृपा असावी. ज्यांनीं ज्यांनीं या उत्सवास द्रव्यद्वारा व अन्य साधनांनी साह्य केलें त्यांवरही आपली कृपा असावी. रघुनाथ बचुवार हा पुण्यास बायको आजारी असल्यामुळें येऊं शकला नाहीं, तरी त्यावर आपली कृपा असावी. गोविंद महाजन यांनीं स्वतः कोठी सांभाळून वाण्याचाहिशोब पाहून जमाखर्चाची सर्व व्यवस्था ठेविली. उत्सवास यासालीं तीन पक्वान्नें केलीं होतीं, हनुमान जयंतीस गोरगरीबाकरितां बेसनाचे लाडू केले होते. चालू सालीं मंडळी दरसालपेक्षां जास्त होती. पुण्याच्या गोविंद आचाऱ्यानें स्वयंपाकाची व्यवस्था उत्तम केली होती. त्यांत माझ्या हातून जाणून न जाणून ज्या कांहीं चुका झाल्या असतील त्यांची या दासाला माफी असावी. असेंच सालोसाल ह्या सकल संतांचा चरणरज जो मी दास गणू त्याच्या हस्तें सेवा घेत जावी अशी माझी नम्र विनंति आपल्या पवित्र चरणापाशीं आहे. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

सकल संतांचा चरणरज

दास गणू

# अध्याय ४१ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरूसाईनाथाय नमः ॥

हेंच साईकथेचें महिमान । कीं तीही परिसा नलगे प्रोत्साहन ॥
श्रोतेच राखूनि पूर्वानुसंधान । अति सावधान श्रवणार्थी ॥ १ ॥

करावया कथापान । जेथें श्रोतेच सावधान ॥
किमर्थ मग प्रार्थावें अवधान । वृत्ती जैं एकतान आधींच ॥ २ ॥

गातांपरिसतां निजगुरु महती । होईल निर्मळ चित्तवृत्ती ॥
दृढ ध्यान नामानुवृत्ती । सुखैक मूर्ती प्रकटेल ॥ ३ ॥

गताध्यायीं जाहलें कथन । कैसें एकाग्रताचें उद्यापन ॥
यथा सांग जाहलें पूर्ण । दृष्टांत खूण समवेत ॥ ४ ॥

तैसीच साईची पार्थिव छवी । कवण्या परी आकस्मिक यावी ॥
कैसी वेळेवर इच्छा पुरवावी । कथा परिसावी ही आतां ॥ ५ ॥

एका होळीचिया सणा । येतों मी आज घाली भोजना ॥
साई ऐसिया देऊनि स्वप्ना । होय मनकामना पुरवीता ॥ ६ ॥

कथा ही पूर्वींच कथिली सविस्तर । परी ती प्रतिमा कैसी वेळेवर ॥
यावी हा कैसा काय चमत्कार । तें आज सादर परिसावें ॥ ७ ॥

कथा सांगे अल्ली महमद। वाटली परम आश्चर्यप्रद ॥
ही तरी एक लीलाच विशद। अति विनोदकारक ॥ ८ ॥

यानींच ती होळीच्या दिवसीं। आम्ही दुपारा जेवावयासीं ॥
बैसावयाचे ऐन समयासी। आणूनि उल्लासित केलें मज ॥ ९ ॥

हें तो पूर्वील कथानुसंधान। आतां श्रोतां सावधान ॥
परिसिजे पुढील निरूपण। चरित्र पावन साईचें ॥ १० ॥

ती ही कथा सरस पूर्ण। श्रोते आधींच दत्तावधान ॥
वक्ता साईपदीं लीन। चरित्र गहन साईचें ॥ ११ ॥

परोपकाराची ती प्रतिमा। परोपकारार्थ झिजवी आत्मा ॥
सदा सर्वदा निर्वैरधर्मा अखंड सत्कर्मा वाहिला ॥ १२ ॥

बरी वाईट कैसीही स्थिती। देहकर्मे देहानसुटती ॥
परी ती लावा अंतर्वृत्ती। गुरुचरणीं प्रीतीपूर्वक ॥ १३ ॥

मग निजभक्ताचा योग क्षेम। गुरु कैसा चालवी अविश्रम ॥
तें गुरुचरणीं ठेवूनि प्रेम। पहा अत्युत्तम अनुभवें ॥ १४ ॥

हे स्थिती मागितल्या न मिळे। ठायीं पडे गुरुकीर्तन मेळें ॥
जें न महत्प्रयत्नेंही आतळे। तें गुरुकृपाबळें चालत ये ॥ १५ ॥

धरोनिया दुरभिमान। करूं आले जे सूक्ष्मनिरीक्षण।
तेही सर्व परतले त्यक्ताभिमान। सुखायमान दर्शनसुखें ॥ १६ ॥

यश श्री औदार्य ज्ञान। शांती वैराग्य हे षड्गुण ॥
ईहीं श्रीसाई भगवंत पूर्ण। ऐश्वर्ये संपूर्ण हरि जैसा ॥ १७ ॥

किती हो आमुचे भाग्य गहन। जेणें हा साईचैतन्य घन।
विनाअर्चन पूजन भजन। देई दर्शन आम्हा तें ॥ १८ ॥

म्हणती भक्तीपाशीं देव। आम्हापाशीं भक्तीचा अभाव ॥
परी हा साई महानुभाव। कनवाळू स्वभाव दीनार्थ ॥ १९ ॥

असो तो अलीच वदेजी आतां । श्रोतां साद्यंत ऐकिजे वार्तात ॥
कळेल साईलीला गहनता । आणीक निजसत्ता तयाची ॥ २० ॥

एके दिवशीं मुंबानगरीं । फिरत असतां रस्त्यावरी ॥
चित्रें मनोहर आणि तसविरी । विकणारा व्यापारी अवलोकिला ॥ २१ ॥
चित्रें सुंदर नानापरींचीं । संता महंता अवलियांची ॥
पाहोनि जाहली वृत्ती मनाची । कवणा कवणाचीं तीं पाहूं ॥ २२ ॥
म्हणोनि एकेक पाहूं लागतां । आवडली ही तसबीर चित्ता ॥
सर्वांहूनि तीची मोहकता । शिवाय तीं आराध्य देवताही ॥ २३ ॥
आधींच मनीं साईंची आवड । सन्मुखतयांची मूर्तीही उघड ॥
पाहूनि घ्यावया जाहली तांतड । किंमत मी रोकड मोजिली ॥ २४ ॥
मग ती तसबीर आणिली घरीं । टांगून ठेविली भिंतीवरी ॥
आनंदें नित्यदर्शन करीं । प्रेमहि मज भारी बाबांचें ॥ २५ ॥
दिधली मीही तुम्हापाशीं । तया आधीं तिसरे मासीं ॥
आराम नव्हता माझिये जीवाशी । राहिलों सहवासीं मेहुण्याच्या ॥ २६ ॥
नूरमहमद पीर भॉय । मेहुणा हा मजला होय ॥
सुजला होता माझा पाय । केला मज उपाय शस्त्रक्रियेचा ॥ २७ ॥
ऐसा असतां दुखणाईत । तीन महिने राहिलों तेथ ॥
कोणीच नव्हतें माझिये घरांत । या तीन महिन्यांत वस्तीस ॥ २८ ॥
प्रसिद्ध बाबा अबदुल रहिमान । मौलाना साब महमद हुसेन ॥
बाबासाई बाबा ताजुद्दिन । इहीं न तें स्थान त्यागिलें ॥ २९ ॥
हे सर्व आणि ऐसेच इतर । यांचीं छाया चित्रें भिंतीवर ॥
होतीं माझिये घरांत मनोहर । सोडी न हें कालचक्र तयांही ॥ ३० ॥
माझी इकडे ऐसी गती । चित्रांमागें कां साडेसाती ॥
चाटे वस्तूसी होतां उत्पत्ती । प्रलय स्थितीही दुर्लंघ्य ॥ ३१ ॥

असो ऐसी असतां परिस्थिती.। साईच कैसे त्यांतून चुकती ॥
हें तो हा काळ वरी ही मज प्रती। कोणीही न सकती सांगावया ॥ ३२॥
ये विषयींची समूळ कथा । विस्मय वाटेल तुम्हां परिसतां ॥
कळेल साईची स्थिरचरात्मकता । अतर्क्य विंदानता तयाची ॥ ३३ ॥
संतबाबा अबदुल रहिमान। यांचे एकचित्र लहान ॥
महमदहुसेन थारियाटोपण । यांचे स्वाधीन होतें कीं ॥ ३४ ॥
तेणें तयाची मज एक प्रत । दिधल्या जाहलीं वर्षें बहुत ॥
ती मी माझे मेहुण्यास देत। कीं ते अंकित तयांचे ॥ ३५ ॥
तीही आठ वर्षेंपर्यंत । होती तयाचे मेजाचे खणांत ॥
सहज एकदां आढळतां अवचित । नेली ती दुकानांत मुंबईस ॥ ३६ ॥
जितुके बाबा अबदुल मोठे । चित्रहि करविलें तेवढें गोमटें ॥
कीं तें न्यावें तयांचिया भेटे । प्रेमहि दाटेल तदंतरीं ॥ ३७ ॥
तयावरून घेतल्या नकला । आप्तेष्टमित्रां दिधल्या सकळां ॥
त्यांतीलचि एक दिधली मजला । होती मी भिंतीला लाविलेली ॥३८॥
मग ती परम सुंदर तसवीर । भरतां अबदुल रहिमान दरबार ॥
नूरमहमद जाहला तत्पर । करावया सादर त्या संता ॥ ३९ ॥
पाहूनि हें तयाचें मन । चित्र पाहतांच अबदुल रहिमान ॥
जाहल अत्यंत कोपायमान । उठले त्या ताडण करावया ॥ ४० ॥
करूनिया निर्भत्सन । दिधलें तयास घालवून ॥
तेणें तो अत्यंत खिन्नवदन । चिंतागहन उद्भवली ॥ ४१ ॥
मग तो होऊनि हीनदीन । उदास आणि उद्विग्नमन ॥
पैक्यापरी पैकाही जाऊन । गुरुकृपे विघ्न उद्भवलें ॥ ४२ ॥

१ बाबा अबदुल रहिमानचे २ फोटोग्राफरचे दुकानांत ३ भेट देण्यात

होतों आज गुरुकृपा संपन्न । तोच मी झालों रोषास कारण ॥
ऐसें वदून साशंक होऊन । चित्र विसर्जन आरंभी ॥ ४३ ॥

म्हणे आतां या संतप्रतिमा । कधींही न घरीं ठेवितां कामा ॥
तेणेंच अंतरलों निज गुरुप्रेमा । किमर्थ रिकामा हा धंदा ॥ ४४ ॥

म्हणे जया चित्राच्या पायीं । गुरु माझा मज नाराज होई ॥
पाडील कधीं तरी तें अपायीं । तें मज नाहीं कामाचें ॥ ४५ ॥

हें तरी एक प्रतिमापूजन । नावडे मम गुरू लागून ॥
तरी मग या नाराज ठेवून । चित्राचें प्रयोजन काय मज ॥ ४६ ॥

जाहला बहु द्रव्यव्यय । करावया या चित्रांचा संचय ॥
तरी त्या आतां न दुजा उपाय । शिवाय तोय विसर्जना ॥ ४७ ॥

म्हणोन मग माझा मेहुणा । सवें घेऊन ती छबी जाणा ॥
न देतां ही मागतिया कवणा । पातले विसर्जना धक्क्यावर ॥ ४८ ॥

गेले अपालो बंदरीं थेट । ठरविली एक भाड्यानें बोट ॥
जाववेल तों जाऊनि थेट । समुद्रीं ती शेवट विसर्जिली ॥ ४९ ॥

असो ते येथेंच नांहीं थांवले । वांद्रे येथें ही तेंच आरंभिलें ॥
सर्वा आप्तेष्टमित्रां विनविलें । फोटो घेतले मागून ॥ ५० ॥

म्हणाले बाबा अबदुल कोपले । फोटो ज्याणीं त्याणीं आपले ॥
परत द्यावे पाहिजे विसर्जिले । सकळां विनविलें एणे परी ॥ ५१ ॥

मजकडूनही दिधलेली प्रत । घेतली माझे भावाचीही परत ॥
बहिणीचीही केली हस्तगत । मिळविल्या समस्त सहा प्रती ॥ ५२ ॥

मग तो घेऊनि सहाही प्रती । वांदे शहरीं समुद्रावरती ॥
थेट जेथें जमीन सरती । पातला ते प्रांतीं सरोष ॥ ५३ ॥

१ ल्यांडसऐंड

पाचारूनि एक कोळी । मग तीं अवघीं चित्रें ते काळीं ॥
करूनियां तयाचे हवालीं । निक्षेपियेलीं अब्धि जलीं ॥ ५४ ॥

मीही तेव्हां व्यथाग्रस्त । होतों तयाचिया घरांत ॥
मलाही तो ऐसेंच उपदेशित । संकटें आणीत या प्रती ॥ ५५ ॥

तरी त्या अवघ्या गोळा करून । करिसील जेव्हां समुद्रीं विसर्जन ॥
तेव्हांच तुझिया व्यथेचें निरसन । होईल जाण निर्धारें ॥ ५६ ॥

मीही माझा पाचारिला मेथा । किल्ली देऊनि त्याचिये हाता ॥
आणविल्या तसबिरी संतांच्या समस्ता । सोंपिली व्यवस्था मेहुण्यातें ॥५६॥

त्यानें अपुला बोलविला माळी । तया करवी त्या तात्काळी ॥
चिंबाईच्या देवळा जवळी । समुद्रजळीं निक्षेपविल्या ॥ ५७ ॥

पुढें जातां दोन मास । होतां आराम मम जीवास ॥
जातां मी अपुलिया बिऱ्हाडास । अति आश्चर्यास पावलों ॥ ५८ ॥

तुम्हांस म्या जी दिली तसबीर । ती द्वारा समोरचि भिंतीवर ॥
पाहोनिया पूर्ववत स्थीर । वाटला मज थोर विस्मय ॥ ५९ ॥

अवघीं चित्रें मेथानें आणिलीं । हीच तसबीर कैसी कीं चुकली ॥
म्हणोनि मी ती तात्काळ काढिली । छपवून ठेविली कपाटीं ॥ ६० ॥

पडतांच मेहुण्याची दृष्टि । घेईल तो ती उठाउठी ॥
नेईल जलसमाधी साठीं । ऐसें मज पोटीं वाटलें ॥ ६१ ॥

ठेवों न लाहे निज गृहातें । मेहुणा पाहतांचि बुडवील हातें ॥
देवों न लाहे आणिकातें । निःशंक चित्तें अभक्ता ॥ ६२ ॥

विना विचारें देईन कवणा । तरी न झालिया योग्य जोपासना ॥
राहील अस्वस्थता सदैव मना । ही दीर्घ विवंचना सर्वदा ॥ ६३ ॥

तरी तें जेथें राहील सुरक्षित । पहावें ऐसें स्थळ त्या उचित ॥
ठेवील अपुले घरीं जो व्यवस्थित । तयाच्या हस्तगत करावें ॥ ६४ ॥

ऐसें मन पडतां अडकित्तां । साईच सुविचार सुचवी चित्ता ॥
जावें मौलाना दरबारीं आतां । इसमूस वृत्तांत कथावें ॥ ६५ ॥

मग मी तेव्हां तैसाचि सत्वरी । गेलों पीर मौलाना दरबारीं ॥
मुजावर इस्मूस ही वार्ता सारी । कळविली अत्यादरीं एकांतीं ॥ ६६ ॥

आम्हां उभयतांचा निर्णय । अपुलेपाशीं राहील ही निर्भय ॥
म्हणोनि ते दिनींच आम्ही उभय । केला कीं निश्चय मनाचा ॥ ६७ ॥

कीं हीं समर्थ साईची छवी । अपुले येथेंच ठेविली जावी ॥
स्वयें आपणा समर्पावी । तेणेंच ती ठायीं पडेल ॥ ६८ ॥

तंव त्या कृत निश्चयानुसार । केली ती प्रतिमा आपणा सादर ॥
पाहूनि आपुलें जेवण तयार । तसाच मी सत्वर परतलों ॥ ६९ ॥

ही लांब कथा परिसावयास । नव्हता आपणा तेव्हां अवकाश ॥
पुढें मागें कथूं ती सावकाश । धरूनि हा उद्देश गेलों मी ॥ ७० ॥

आज उद्यां करितां करितां । सबंध नऊ वर्षें भरतां ॥
आज ही झाली भेट अवचिता । आपणा उभयतां परस्पर ॥ ७१ ॥

तेणें ही आठवली पूर्वपीठिका । आपणही कथिलें स्वप्न कौतुका ॥
संबंध जुळला अपूर्व कथानका । नाहीं अद्भुत का ही लीला ॥ ७२ ॥

आतां एक दुजी कथा । सावध चित्तें परिसिजे श्रोतां ॥
साई कैसा प्रेमळ भक्तां । अति सप्रेमता वागवित ॥ ७३ ॥

ज्या परमार्थीं खरी गोडी । तयांची साईस मोठी आवडी ॥
वारूनि सर्व तयांचीं सांकडी । स्वानंद जोडी दे तयां ॥ ७४ ॥

ये अर्थीचा अनुभव गोड । बाळासाहेब देवांची होड ॥
पुरविली पुरवूनि तयांचें कोड । दिधली त्यां[१] जोड भक्तीची ॥ ७५ ॥

---

१ अ० ४० यांत उद्यापनाची कथा ज्यांची दिलेली आहे तेच हे बाळासाहेब देव.

दिवसा नोकरी केल्याशिवाय । योगक्षेमा नव्हता उपाय ॥
परी रात्रौ परमार्थ व्यवसाय । कराया व्यत्यय कां यावा ॥ ७६ ॥

इच्छा फार दिवसापासून । करावें नित्य ज्ञानेश्वरी वाचन ॥
परी कांहीं ना कांहीं विघ्न । येऊन तें हातून घडेना ॥ ७७ ॥

भगवद्गीता एक अध्याय । जैसा रोज नेमानें होय ॥
तैसाच ज्ञानेश्वरीचा निश्चय । विना अंतराय तगेना ॥ ७८ ॥

हातीं घेतां इतर ग्रंथ । नित्य नेमें वाचिले जात ॥
ज्ञानेश्वरीवरी प्रबल हेत । नियम न जात तडीस ॥ ७९ ॥

घेऊनि रजा तीन मास । एकदां देव गेले शिर्डीस ॥
तेथून निजगृहीं पौंडास । सुखें घ्यावयास विश्रांती ॥ ८० ॥

तेथेंही इतर कार्यें झाली । इतर नेमाची पोथी वाचिली ॥
ज्ञानेश्वरीची हौस न पुरली । वेळ न आली तियेला ॥ ८१ ॥

हातीं घेतां ज्ञानेश्वरी । विकल्प कांहीं उठावे अंतरीं ॥
जेणें वाचन होई वरवरी । प्रेम अंतरीं उपजेना ॥ ८२ ॥

काय करून कासाविसी । केला निश्चय न पावे सिद्धीसी ॥
पांच ओव्याही नित्य नेमेसी । घडलें न प्रतिदिवशीं वाचावया ॥८३॥

प्रत्यही पांच ओव्या निदान । निश्चय केला मनापासून ॥
त्याही न नेमें मज हातून । उल्हासें वाचून जाहल्या ॥ ८४ ॥

म्हणोनि मग केला नेम । साईच जेव्हां देतील प्रेम ॥
म्हणतील "वाच" तेव्हांच उपक्रम । करीन संभ्रम विरहीत ॥ ८५ ॥

निष्ठा साईच्या पायापाशीं । जेव्हां साई देतील आज्ञेशीं ॥
तेव्हांच वाचीन ज्ञानेश्वरीशीं । कृत निश्चयेसीं बैसलों ॥ ८६ ॥

असो येतां महोदय पर्व । सवें मातोश्री भगिनी सर्व ॥
पहावया गुरु पूजा गौरव । पातले मग देव शिर्डीस ॥ ८७ ॥
कांही आताशा नाहीं वाचत । ज्ञानेश्वरी आपण नित्य ॥
जोग तेथें देवांसी पुसत । प्रत्युतर देत तें परिसावे ॥ ८८ ॥
ज्ञानेश्वरीची मोठी हौस । परी न ती जाई सिद्धीस ॥
आतां बाबाच जेव्हां वाचावयास । वदतील ते वेळेस वाचीन ॥ ८९
तंव जोग कथिती युक्ती । ज्ञानेश्वरीची आणून पोथी ॥
द्यावी साईबाबांचिये हातीं । वाचावी ते देती तव तुम्ही ॥ ९० ॥
नलगे मज कांहीं युक्ति । बाबा माझें अंतर जाणती ॥
तें कां न माझी अढी पुरवीती । 'वाच' स्पष्टोक्ति वदतील ॥ ९१ ॥
घेतां समर्थांचें दर्शन । रुपया एक केला अर्पण ॥
एकचि कां वीस आण । म्हणती त्यालागून तंव बाबा ॥ ९२ ॥
आणून वीस रुपये दिधले । रात्रीं बालकरामास भेटले ॥
साईकृपा कैसी पावले । वृत्त त्यां पुसिलें पूर्वील ॥ ९३ ॥
उद्या आरती झाल्यावरती । सांगेन मी सकळ तुम्हाप्रती ॥
ऐसें बाळक राम आश्वासिती । बरें म्हणती देव तया ॥ ९४ ॥
पुन्हा देव दुसरे दिवशीं । जातां मशीदी दर्शनाशीं ॥
वीस रुपये मागितले त्यांशीं । दिधले सुख संतोषीं देवानें ॥ ९५ ॥
पाहूनि तेथें अत्यंत बीड । देव राहिले बाजूस आड ॥
बाबा पुसती कोठेरे सांकड । जागेंत अवघड तो दडला ॥ ९६ ॥
देती देव प्रत्युत्तर तेथें । बाबा हा मी आहे ना येथें ॥
कां सांतचि ना झालेत देते । बाबा तंव तयातें पुसतात ॥ ९७ ॥

१ इ० स० १९१४ चा फेब्रुवारी महिना.

देव वदती वीस दिधले। पैसे कोणाचे बाबांनीं पुसलें ॥
बाबा अपुले तंव ते वदले। कां मग सुटले पळत तुम्ही ॥ ९८ ॥
यावें ऐसें जवळ यावें। स्वस्थ चित्तें निकट बैसावें ॥
आज्ञेप्रमाणें केलें देवें। मनोभावें तें बैसले ॥ ९९ ॥
नित्यनेम आरती झाली। मंडळी स्वस्थानीं परतली ॥
बाळक रामा देवा गांठ पडली। पृच्छा ती आरंभिली पूर्वील ॥१००॥
तयांचा पूर्ववृत्तांत पुसिला। तयांनीं तो साद्यंत कथिला ॥
कैसें लावियलें उपासनेला। देव मग तयाला वदतात ॥ १०१ ॥
केलें काय तुम्हा निवेदन। कैसें करावें ब्रह्मचिंतन ॥
कराकीं माझी जिज्ञासापूर्ण। देव मग त्यांलागून प्रार्थिती ॥ १०२ ॥
बालक रामही देवांप्रती। करावया तयांची जिज्ञासापूर्ती ॥
उत्तर द्यावया जों आरंभकरिती। बाबाच बोलाविती देवांस ॥ १०३ ॥
कैसा साई परम लाघवी। चंद्रूसं देवांते बोलावूं पाठवी ॥
देव न क्षण विलंब लावी। आले श्रीसाईस भेटाया ॥ १०४ ॥
झाले होते तीन प्रहर। मशीदीचिया तटावर ॥
टेकूनिया दोन्ही कर। दिसले समोरचि श्रीसाई ॥ १०५ ॥
देव जातांच केलें वंदन। बाबा तयांस पुसती प्रश्न ॥
कोठें कोणासीं काय आवण। करीत संभाषण होतां कीं ॥१०६॥
मग देव उत्तर देती। काकांचिया माडीवरतीं ॥
बालकरामाचिया संगतीं। आपुलीच कीर्ति परिसियली ॥ १०७ ॥
रुपये आण पंचवीस। बाबा आज्ञापिती देवांस ॥
आणूनिया तेच समयास। रुपये बाबांस समर्पिले ॥ १०८ ॥

१ या नावाचा एक व्याधिष्ट त्यावेळीं बाबापाशीं होता

किती पुसती आणिलेस । देव वदती पंचवीस ॥
बाबा म्हणती चलये बैस । गेले तव मशीदीस बाबांसह ॥ १०९ ॥
बाबा बैसले खांबापाशीं । दुजे न कोणीही मशीदीसीं ॥
म्हणती तुवां माझिये चिंधीसी । चोरियेलेसीं मज न कळतां ॥ ११० ॥
मला चिंधी ठाऊक नाहीं । म्हणोनि देव देती ग्वाही ॥
येथेंच कोठें तरी पाही । झाले मग साई वदते तया ॥ ११ ॥
येथें आहे कोठें चिंधी । ऐसें देव वदले ते संधीं ॥
बाबा उठले म्हणती तूं शोधी । खोटी ही बुद्धि चोरीची ॥ ११२ ॥
कवण्या कारट्यानें ती नेली । बघ बघ पाहिजे येथेंच असली ॥
ऐकून देवांनी आणीक शोधिली । नाहीं ती आढळली तरी ही ॥११३॥
मग भृकुटीस घालून आंकडे । पाहूनियां इकडे तिकडे ॥
दृष्टि टवकारुनी देवाकडे । साई कडकडे देवांवर ॥ ११४ ॥
म्हणे तूंच लबाड होसी । तुजवीण कोण ये समयासी ॥
येईल चिंधी चोरावयासी । चोर मी तुजसींच समजतों ॥ ११५ ॥
ऐसा येथें जो येतोस । तो काय चोऱ्या करावयास ॥
झाले काळ्याचे पांढरे केंस । खोड न लवलेश कीं जाई ॥ ११६ ॥
तुला कुऱ्हाडीनें हाणीन । तुला कापीन ठार करीन ॥
जाशील कोठें माझिया हातून । येईन मारोन तेथें तुज ॥ ११७ ॥
घरून येतोस जो शिरडीस । तो काय चोऱ्या करावयास ॥
घे हे अपुले वापस । आणून चिंधीस दे माझ्या ॥ ११८ ॥
क्रोधें लाल झाले साई । उद्धारियेली आई माई ॥
शिव्या-शापांची लागली रयी । संतापें लाही जाहली ॥ ११९ ॥
कोपले देखूनि साईनाथ । देव कौतुक पाहतात ॥
जागेच उभे राहतात । आश्चर्यभरित मानसें ॥ १२० ॥

देव सन्निध आणि एकटे । पाळी माराची येणार वाटे ॥
कीं हे विश्वरूप दर्शन गोमटें । जाणूनि दाटे आनंद ॥ १२१ ॥

घेतील काय सटका आतां । करितील काय त्वेषें आघातां ॥
एकला मी सांपडलों हाता । येईल चित्ता ते करो ॥ १२२ ॥

परी हें चिंधीचें काय कोडें । तें तों देवांस कांहींही नुलगडे ॥
जा निघून जा म्हणतां एकीकडे । तवते पायरीकडे सरकले ॥ १२३

काय चिंधीचा गुह्यार्थ । जाणावया मी नाहीं समर्थ ॥
पावेन साईकृपेचा स्वार्थ । तयीं तो श्रोत्यांर्थ निवेदीन ॥ १२४ ॥

होतां अर्ध घटकाभर । आले देव बाबां समोर ॥
चालूच होता शिव्यांचा गजर । आलास कां वर म्हणाले ॥ १२५ ॥

जा हो चालता वाडियांत । म्हणतां देव आज्ञा वंदित ॥
नमन करून चरणाप्रत । पातले परत वाडिया माजी ॥ १२६ ॥

झालेली सर्व हकीगत । घडली जैसी तैसी यथार्थ ॥
जोगांस आणि बालकरामाप्रत । केली निवेदित साद्यंत ॥ १२७ ॥

पुढें एक सवंध घटका । उडाला शिव्या शापांचा दणका ॥
प्रहरा दों प्रहरां मागें मग लोकां । बाबाच अवलोका आमंत्रित ॥१२८

देवही मग तेथें आले । इतरां माजी जाऊन बैसले ॥
म्हाताऱ्याचिया जीवा लागलें । असेल मग बोले श्रीसाई ॥ १२९

चिंधीची ती कथा काय । तरी म्या दुरुक्तीं केलें घाय ॥
होतीच चोरिली त्या काय उपाय । बोलल्या शिवाय रहावेना ॥१३०

असो अल्ला सारें बघील । तोही तयाचें बरें करील ॥
तंवएं भाऊ दक्षिणा देसील । पुसती क्षमाशील श्रीसाई ॥ १३१ ॥

किती आणूं देव पुसती । बारा घेऊनि येईं त्वरिती ॥
पाहूं जातां नोटचि होतो । रुपये न मिळती तियेचे ॥ १३२ ॥

वें तैसेंच बाबांस कथिलें । राहूंदे मज नको ते वदले ॥
काळीं त्यां दोनदां दिधले । स्मरण न राहिलें मज त्याचें ॥ १३३ ॥

रीही देवांनीं रुपये मिळविले । बाबा लागीं आणून दिधले ॥
वें तयांचें चरणही वंदिले । परिसा मग निघाले जे बोल ॥ १३४ ॥

काय रे तूं करीत अससी । "कांहीं नाहीं" वदतां तयासीं ॥
पोथी वाचीत जा नेमेंसी । केलें देवांसी आज्ञापन ॥ १३५ ॥

वाडिया माजी जाऊन बसावें । नित्य नेमें वाचीत जावें ॥
वाचितांना सांगतही असावें । निरूपण भावें सकळिकां ॥ १३६ ॥

सवंध भरजरी सुंदर शेला । बसलों असतां तुज द्यावयाला ॥
जासी कां चिंध्या चोरावयाला । सवई कां तुजला चोरीची ॥ १३७ ॥

असो करावें पोथी वाचन । साई मुखीचें हें वचन ॥
पावूनि माझी मी अंतरी खूण । अति सुखसंपन्न जाहलों ॥ १३८ ॥

मानूनि ती आज्ञा प्रमाण । मग म्यां तया दिवसापासून ॥
नित्य ज्ञानेश्वरीचें वाचन । तैसेंच निरूपण आरंभिलें ॥ १३९ ॥

मिळाली आज्ञा वांछिली आतां । फिटली व्रतस्थ मनाची चिंता ॥
येथून मज ज्ञानेश्वरी वाचितां । येईल नियमितता वाचना ॥ १४० ॥

आतां मी गुर्वनुज्ञाधर । आतां प्रसन्न मज ज्ञानेश्वर ॥
माजी पडलें जें झालें आजवर । वर्तणें अतःपर नियमानें ॥ १४१ ॥

साक्ष मजला माझें मन । वरी साई आज्ञा प्रमाण ॥
आज्ञाबळें पोथी पारायण । आतां मज निर्विघ्न घडेल ॥ १४२ ॥

बाबा मी येतों लोटांगण । अनन्य भावें तुम्हा शरण ॥
पदरीं घ्याया लेंकरा आपण । करवून घ्या वाचन मज करवी ॥१४३॥

चिंधी तें काय ध्यानांत आले । बालकरामास होतें जें पुसिलें ॥
त्याच चिंध्या तेंच न रुचलें । साईस जैं भरले रागानें ॥ १४४ ॥

कैसें तुम्हास उपासनेस । कैसें परब्रम्ह चिंतनास ॥
लाविलें म्हणून बाळकरामास । पुसिलें तें बाबांस नावडलें ॥ १४५ ॥

वाटेल त्या प्रश्नाचें उत्तर । स्वयें द्यावया असतां तत्पर ॥
किमर्थ चौकशा कराव्या परस्पर । म्हणोनि मज दुर्धर छळियेलें ॥१४६

" छळियेलें " हे बोलचि उद्धत । प्रेमे भक्तार्थ जो ओथंबत ॥
भक्तवत्सल ज्या स्वप्नींही न दिसत।छळणें त्या अनुचित क्रियापद॥१४७

छळिलें नव्हे मज शिकविलें । चित्तीं तुझिया जेंजें उद्भवलें ॥
तें तें म्या पाहिजे स्वयें पुरविलें । कधीं न चोरिलें कामा ये ॥ १४८

साई बाह्य क्रोधाभिभुत । अंतरीं ते नित्य मुदित ॥
बाह्य संतापे दिसत संतप्त । अंतरीं ते तृप्त आनंदें ॥ १४९ ॥

क्रोधाचें बाह्य लौकिक लाघव । अंतरीं परमानंद गौरव ॥
तया साईचें लीला वैभव । गावया सुदैवचि पाहिजे ॥ १५० ॥

साधावया निज स्वार्थ । जया पोटीं अत्यंत आर्त ॥
शिव्या पुष्प झाखोल्या मानित । दृष्टी निजहित तत्पर ॥ १५१ ॥

परिसनि कर्णकटु अश्लील वचन । डळमळेना देवाचें मन ॥
पोटीं प्रेमाचें भरतें गहन । वाटे तें ताडण पुष्पांचें ॥ १५२ ॥

दुग्धें भरली धेनूची कास । भाग्यवानास लाभे गोरस ॥
कासे पासीचगोचिडावास । अशुद्धचि कर्मास तयाच्या ॥ १५३ ॥

दर्दुरा कमलकंदा शेजार । लुटी कमल मकरंद भ्रमर ॥
दुर्दैवी दर्दुरांपंकाचा आहार । दैवास न पार भ्रमराच्या ॥ १५४ ॥

तैसे तुम्ही भाग्यवान । तुम्हा आम्हा संन्निधान ॥
मानेल तें घ्यारे पुसून । शंका समाधान साईवदें ॥ १५५ ॥

पहा माझी पोथीची अढी । वाचीन " वाच " वदतिल ते घडी ॥
तोंवर ज्ञानेश्वरी मी नुघडी पुर्विली रोकडी बाबांनी ॥ १५६ ॥

कैसी माउली करी लाड। निजबालकाचे पुरवी कोड॥
तयाची ही प्रतीती गोड। भक्तीची जोड ही कथा॥ १५७॥

वाच म्हणून नाहीं थांबले। देव वदती वर्ष न उलटलें॥
स्वप्नीं येऊन दर्शन दिधलें। आश्चर्य मज पुसिलें तें परिसा॥ १५८॥

सन एकुणीससें चवदा। एप्रील दुसरी तारीख तदा॥
वार गुरुवार उजाडतां एकदां। स्वप्न प्रसादा पावलों॥ १५९॥

समर्थ साई स्वप्नीं आले। आहेत माडीवरती बैसले॥
पोथी समजते कां मज विचारले। उत्तर दिधलें नकारीं॥ १६०॥

तैसाच प्रश्न झाला नंतर। मग ती केव्हां समजणार॥
आलें माझिया नेत्रास नीर। काय म्या प्रत्युत्तर दिधले॥ १६१॥

कृपा आपुली झालिया वीण। पोथी वाचणें केवळ शीण॥
समजणें तो त्याहूनही कठिण। बाबा मी निक्षून सांगतों॥ १६२॥

बाबा वदती पोथी पढता। फारचि आपण घाइ करितां॥
वाचा पाहूं ती मज देखतां। निकट बैसतां मज पाशीं॥ १६३॥

काय वाचूं देव वदती। अध्यात्माची आज्ञा देती॥
देव पोथी आणूं जाती। नेत्र उघडती तात्काळ॥ १६४॥

देव तव्हां जागे होती। स्वप्नस्थिती पाहुनि निश्चिती॥
काय वाटावें तयांचे चित्तीं। कल्पना श्रोतीं कीजेती॥ १६५॥

पाहूनिया वर्षभर वाट। मानीं की बाळ आज्ञा नीट॥
करितों कीं नित्य पोथीचा पाठ। काळजी उद्धट ही कोण॥ १६६॥

पाळी काय लाविली शिस्त। दिधला धडा गिरवी का नित्य॥
चुके कोठे वा किंनिमित्त। कवण हें सतत पाहील॥ १६७॥

वांचकें असावें कैसें दक्ष। ठेवणें कोठें विशेष लक्ष॥
साई माउलीवीण प्रत्यक्ष। कवण ही साक्ष पटवील॥ १६८॥

ऐसी साई समर्थ लीला। ऐसा स्वानंदाचा सोहळा ॥
भक्तीं भोगिला असंख्य वेळा। देखिला म्यां डोळा प्रत्यक्ष ॥ १६९
आतां आपण श्रोते मंडळी। होऊं कीं लीन गुरुपद कमळीं ॥
परिसूं पुढील कथेची नव्हाळी। यथाकाळीं पुढारा ॥ १७० ॥
आठवूनि श्रीसमर्थ चरण। सद्भावें मी येई लोटांगण ॥
तेणेंच सकल भव दुःखविमोचन। भावार्थें शरण हेमाड ॥ १७१ ॥
साईच एक तयाचा स्वार्थ। साईच निरतिशय सुखपरमार्थ ॥
साईच तया करील कृतार्थ। निश्चित हा भावार्थ तयाचा ॥ १७२ ॥

इतिश्री संतसज्जन प्रेरिते। भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साई समर्थसच्चरिते। साईकृपानुग्रहदानं नाम
एक चत्वारिंशत्तमोऽध्यायः संपूर्णः ॥

श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु। शुभंभवतु ॥

## श्रीसाईनाथ प्रसन्न

### सालमजकुरीं. शिर्डी येथील गोकुळ अष्टमी उत्सवाचा कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे.

श्रावण कृ० १ (तारीख २४ आगष्ट) मंगळवारीं सकाळीं नामसप्ताह सुरु होईल व श्रावण कृ० ९ मंगळवारी सकाळीं नित्याप्रमाणें काकड-आर्ती होऊन समाप्त होईल. सप्ताहाचे प्रसंगीं हरिभक्तपरायण मारुतीबुवा यांचें कीर्तन होईलः—

श्रावण कृष्ण ८ सोमवारीं मध्यरात्रीं श्रीकृष्ण जन्मोत्सव होईल.

श्रावण कृष्ण ९ मंगळवारीं दिवसा भंडारा होऊन
रात्रौ दिंड्यांसह पालखीची मिरवणूक होईल.

श्रावण कृ० १० बुधवारीं सकाळीं काला होईल.

या उत्सवास समर्थभक्तांनीं अवश्य येण्याचें करावें. उत्सवाप्रीत्यर्थ कोणाला कांहीं पाठवावयाचें असल्यास तें रा. रा. तात्या गणपतराव पाटील कोते यांचे नावें मुक्काम पोष्ट शिर्डी, तालुका कोपरगांव जिल्हा अहमदनगर या पत्त्यावर पाठवावें.

आपले

तात्या गणपतराव कोते
पाटील
रामचंद्र दादा पाटील.

सूचनाः—स्फूट पृ. ३७० प्यारा १२ ओळ २१ मध्यें. रु. चे पुढें २०० रक्कम व

 Register No. B. 17

श्री साईलीलेंत जाहिराती घेण्याचें ठरविलें आहे. या पानावरील र मै जा
जाहिरातीकरितां मोकळी आहे. जाहिरात देणारानें आमचेकडे प नियम
करावा. खालील पुस्तकें आमचेकडे मिळतील.

श्रीसाईनाथ सगुणोपासना किं. ८=

ह. भ. प दासगणु कृत

संतलीलामृत

भक्तलीलामृत

गो. र. दाभोळकर

५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें मुंबई नं. २

श्री साईनाथ भजनमाला, श्रीमति सावित्रीबाई तेंडुल्कर, रंगाऱ्या
चाळ वांद्रें येथें मिळेल.

## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू** महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.